भीमा भोई

अस्तरावरील पाषाण चित्रात राजा शुद्धोदनाच्या दरबारातील दृश्य आहे. त्यात तीन ज्योतिषी बुद्धाची आई, मायाला स्वप्नाचा अर्थ समजावून सांगत आहेत. इ. स. दुसऱ्या शतकातील नागार्जुन-कोंडा येथील एका शिलात कोरलेल्या या प्रसंगात खालच्या बाजूला बसलेला राजचिटणवीस स्वप्नाचा अर्थ लिहून घेत आहे. भारतीय लेखनकलेचा शिल्पबद्ध पुरावा देणारे हे अत्यंत पुरातन शिल्प असावे असा अंदाज आहे.

राष्ट्रीय संग्रहालय, नवी दिल्ली, यांच्या सौजन्याने

भारतीय साहित्याचे निर्माते

भीमा भोई

लेखक

सीताकान्त महापात्र

अनुवादक

म.द. हातकणंगलेकर

साहित्य अकादेमी

Bhima Bhoi (भीमा भोई) :
Marathi translation by M.D. Hatkananglekar of
Sitakant Mahapatra's Monograph in English

Sahitya Akademi, New Delhi (1997), Rs. Twenty Five

First Edition : 1997

Published by :
Sahitya Akademi

Head office :
Rabindra Bhavan, 35, Ferozeshah Road, New Delhi 110 001

Sales Department :
Basement in 'Swati', Mandir Marg, New Delhi 110 001

Regional Offices :
172, M.M.G.S. Marg, Dadar (East), Mumbai 400 014
Jeevan Tara, 23A/44X, Diamond Harbour Road, Calcutta 700 053
Guna, 304-305, Anna Salai, Teynampet, Madras 600 018
ADA Rangamandira, 109, J. C. Road, Bangalore 560 002

ISBN 81-260-0370-7

मूल्य 25 रुपये

Printed by : Jaymalhar Printing Press, 217 Ashish Ind. Estate, Gokhale Road (S), Dadar, Mumbai 400025

अनुक्रमणिका

1.

एका अल्पपरिचित जीवनाची रूपरेषा

भीमा भोईची नेमकी जन्मतारीख, त्याच्या जीवनाची रूपरेषा किंवा तपशील, तो जन्मापासून आंधळा होता का? यापैकी कुठलीच माहिती ऐतिहासिक कागदपत्रांतून मिळत नाही. भीमा भोईच्या जन्माची नेमकी तारीख आणि ठिकाणच अजून निश्चित करता आलेले नाही. या बाबतीत ऐतिहासिक दृष्ट्या निश्चित केलेली वस्तुस्थिती आपल्याला माहीत नाही, केवळ दंतकथा मिळतात. काही अभ्यासकांच्या मते त्याचा जन्म एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात केव्हातरी संबळपूर जिल्ह्यातील रायराखोल उपविभागात, काकडापारा खेड्यातल्या गरीब कोंढ कुटुंबात झाला. अशी कथा आहे की, दानरा व गुरुबारी या कोंढ दांपत्याने जंगलात सापडलेल्या एका अनाथ बालकाला जवळ केले आणि त्याचे नाव भीमा भोई ठेवले. प्रा. एन्. एन्. बसू आपल्या 'Modern Buddhism and Its Followers in Orissa' ('आधुनिक बौद्ध धर्म आणि त्याचे ओरिसातील अनुयायी') या ग्रंथात म्हणतात की, भीमा भोईचा जन्म पूर्वीच्या धेनकताल राज्यात, जोरांदा नावाच्या खेड्यात झाला. त्याचे नाव भीमसेन भोई आराखिता दास असे होते. तो जन्मांध होता. मुळात तो जन्मांध होता की कुठल्या दुर्दैवी अपघातात तरुणपणी त्याची दृष्टी गेली याविषयी बरेच मतभेद आहेत. श्री. बी. सी. मुझुमदार यांनी यांपैकी दुसरा तर्क स्वीकारला आहे. पंडित विनायक मिश्रा यांचे मतही असेच आहे. प्रा. आर्तबल्लव महंती हे आपल्या 'स्तुतिचिंतामणी'च्या प्रस्तावनेत शामघनाची 'अलेखमालिका', अच्युतानंदाची 'महाशून्यसंहिता', 'निर्गुणसंहिता', यशोवंताची 'मालिका' आणि श्रीधराची 'सिद्धचंद्रिका' असे पूर्वसूरींचे दाखले देतात आणि त्या आधारे भीमा निःसंशयपणे जन्मांध होता असे प्रतिपादन करतात.

दंतकथा असे सांगते की, एका मध्यरात्री महिमास्वामी आणि त्यांचे शिष्य सिद्ध गोविंदबाबा भीमाच्या गावात आले आणि त्यांनी त्याला हाक मारली. भीमाला आश्चर्य वाटले आणि त्याने 'कोण आहे?' म्हणून विचारले, तेव्हा गुरू-शिष्यांनी त्याला सांगितले की, त्याच्या पूर्वजन्मीच्या सत्कृत्यांमुळे ते त्याला भेटायला आले होते. भीमा म्हणाला, "तुम्ही जर मला आशीर्वाद द्यायला आला असाल, तर मला तुम्हाला पाहायची शक्ती द्या." मग त्याला दिसायला लागले. तो बाहेर आला आणि त्याने घराच्या बाहेर उभ्या असलेल्या सूर्य आणि

चंद्रासारख्या त्या महात्म्यांना पाहिले. महिमास्वामींनी त्याला आशीर्वाद दिला आणि सांगितले की, महिमा पंथाच्या तत्त्वांचा प्रसार या शतकात करण्यासाठी पूर्व संकेतानुसार त्याची निवड झाली आहे. महिमास्वामींनी त्याला अलौकिक प्रतिभेचे वरदान दिले. भीमाने त्यांना प्रार्थना केली, ''भगवन्, तुम्ही दिलेल्या दृष्टीच्या सामर्थ्याने मी तुमचे दिव्य चरण पाहिले पण या जगातली मलीनता पाहण्याची माझी इच्छा नाही. मला आशीर्वाद द्या की, बाहेरचे जग मला दिसू नये.'' स्वामींनी त्याला आशीर्वाद दिला आणि सांगितले, ''तुझे अंतश्चक्षू उघडतील व बाह्यचक्षू पूर्वीप्रमाणे मिटलेले राहतील.'' भीमा पुन्हा आंधळा झाला. विश्वनाथबाबांच्या 'सत्य महिमा धर्म इतिहास'मध्ये ही कथा सांगितली आहे. 'निर्वेदसाधना'च्या पहिल्या प्रकरणात भीमाने बहुधा याच प्रसंगाचा निर्देश केलेला असावा –

''मी अचानक जागा झालो आणि माझ्या शेजारी शून्यब्रह्म पाहिले. मी डोळे चोळले व पुन्हा पाहिले तर ते गुरू आणि शिष्य होते. मी त्यांच्या पायाशी नत झालो आणि त्यांनी मला आशीर्वाद दिला.''

भीमाच्या कवितांमध्ये असे संदर्भ आहेत की, तो चार वर्षांचा असताना त्याने भटकणारा योगी 'पाहिला'. त्याच्या हातावर शंख आणि चक्राची दैवी चिन्हे होती. हा योगी त्याच्या गावात भिक्षा मागण्यासाठी आला होता. भीमाच्या बालपणात त्याला जे साक्षात्कार झाले त्यांपैकी हा एक असावा. हा योगी म्हणजेच त्याचे श्रेष्ठ गुरू महिमा गोसावी असावेत. या गुरूंना त्याने आपल्या अनेक कविता आणि भजने अर्पण केली आहेत. योग्याला 'पाहणे' म्हणजे डोळ्यांनी पाहणे नसून ते प्रतिकात्मक असावे, असे म्हणता येईल. अनेकांचे म्हणणे तसेच आहे. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर हा केवळ एक साक्षात्कार होता, आध्यात्मिक जागृतीची पहाट होती. तिने अज्ञानाची अभ्रे दूर सारली. कदाचित या दर्शनानेच तो साक्षात्कारी बनला. त्याच्या काव्यात प्रत्यक्ष सृष्टी फारशी आढळत नाही हे खरे आहे. बहुधा त्याची सृष्टी म्हणजे अलौकिक प्रकाश, वास्तव आणि अस्तित्वाने भारलेली अंत:सृष्टी असते. एका अथांग चिंतनात्मक व अंत:प्रेरणांच्या जाणिवेतून ही अंत:सृष्टी निर्माण झाली असावी असे वाटते. पण त्याचबरोबर मानवी जीवनातल्या विविध कृती, निरागस बालपण, आपल्या सळसळत्या चैतन्याने काही वेळा जीवनाच्या खऱ्या ध्येयाचा विसर पाडणारे, प्रेम आणि वासनांच्या मृगजळामागे धावायला लावणारे आणि शेवटी आपण काय गमावले याची जाणीव देणारे तारुण्य या सर्वांचे जिव्हाळ्याचे आंतरिक संदर्भ आहेत. मानवी जीवनातील विविध अवस्था, शोकांतिका आणि विजय यांची भीमाने केलेली वर्णने भावपूर्ण आणि सळसळत्या चैतन्याने भरलेली आहेत. त्यातून भीमाचे अभ्यासपूर्ण ज्ञान नव्हे तर तीव्र आंतरिक जाणीव दिसून येते. या संदर्भात बी.सी. मुझुमदारांचे मत योग्य ठरेल. त्यातून भीमाच्या जीवनाच्या काही महत्त्वाच्या अंगांचे दर्शन होत असल्याने ते उद्धृत केले आहे.

''संबळपूरच्या जिल्हा गॅझेटमध्ये प्रकाशित झालेल्या, माझ्या भीमा भोईविषयीच्या माहितीमध्ये, एका महत्त्वाच्या मुद्यामध्ये दुरुस्ती करायला हवी. भीमा भोईच्या एकत्रित केलेल्या

साहित्यातील अंतर्गत पुराव्यावरून मला निश्चितपणे वाटते की, तो जन्मांध नव्हता तर तारुण्याच्या प्रारंभीच्या काळात तो अंध झाला. तो लहानपणी लिहायला-वाचायला शिकला असला पाहिजे, पण ओरिसाच्या भागवत मठात, पुस्तकांची पारायणे ऐकून त्याने जुन्या काळातील उडिया साहित्याचे ज्ञान मिळवले असले पाहिजे. त्याची बुद्धिमत्ता आणि नव्या कल्पना ग्रहण करण्याची क्षमता अलौकिक होती. त्याने जगन्नाथदासाचे भागवत आणि इतर पुराणे अनेक हिंदू खेड्यातून ऐकली. या पद्धतीने त्याने जे जे ऐकले ते आपल्या अद्‌भुत स्मरणशक्तीमध्ये साठवून ठेवले.

एकदा भीमा भटक्या कुंभीपातिया कीर्तनकारांच्या सहवासात आला आणि या नव्या पंथाचे आकर्षण त्याला वाटू लागले. तो या पंथाच्या गुरूंना भेटण्यासाठी धेनकनालला गेला आणि तिथे त्याने त्या गुरूचे शिष्यत्व पत्करले. त्यानंतर त्याने कुंभीपातियांच्या तत्त्वांमध्ये काही बदल केले आणि तो स्वत: अलेखधर्माच्या नव्या प्रकाराचा गुरू बनला. आंधळा असलेला, कोंढासारख्या नीच जातीत जन्मलेला भीमा भोई एका अभिनव धर्माचा प्रवर्तक बनला की, ज्या धर्माने जातिव्यवस्था आणि मूर्तिपूजा झुगारून दिल्या आहेत; हा एक चमत्कारच म्हणावा लागेल. त्याचे प्रमुख पीठ सोनपूरच्या सरंजामशाही संस्थानामध्ये होते. तिथे त्याचे अनुयायी त्याची प्रवचने ऐकण्यासाठी प्रचंड संख्येने जमत असत. काही विद्वान ब्राह्मण त्याचे शिष्य झाले आणि त्यांनी जातिव्यवस्थेचा त्याग केला. हे ब्राह्मण विशेषत: भीमा भोईची उत्स्फूर्त काव्ये उतरवून घेण्याचे काम करीत असत.''

डॉ. मायाधर मानसिंह आपल्या 'उडिया साहित्याचा इतिहास' (History of Oriya Literature) या पुस्तकात असे लिहितात की, भीमाची दृष्टी त्याच्या बालपणीच गेली आणि त्याचे कारण देवीची जबरदस्त लागण हे असावे. प्रसिद्ध समीक्षक चित्तरंजन दास आपल्या 'ओडिसरा महिमा धर्म' या पुस्तकात हाच दृष्टिकोन मांडतात. सत्यमहिमा धर्मावरील सर्वश्रेष्ठ हयात तज्ज्ञ श्री. विश्वनाथ बाबांनीसुद्धा आपल्या लिखाणात अनेक ठिकाणी असा उल्लेख केला आहे की, भीमा हा कवी खरे म्हणजे आंधळाच होता.

यावरून असे दिसेल की, अनेक समीक्षक आणि साहित्याचे इतिहासकार यांचे एकमत आहे की भीमा हा एकतर जन्मांध होता किंवा लहानपणी किंवा किशोरवयात त्याची दृष्टी गेली असावी. यातून पुढचा निष्कर्ष असा निघतो की, त्याने पारंपरिक उडिया किंवा संस्कृत साहित्याचे फारच थोडे वाचन केले होते. त्याच्या रचना त्याने तोंडी सांगून त्याच्या शिष्यांनी उतरवून घेतल्या असाव्यात. मुख्य म्हणजे त्याच्या सत्यमहिमा धर्मातील प्रवेशामुळे त्याच्या दिव्यप्रेरणेच्या भूमिकेलाही मोठे प्राधान्य मिळते.

भीमा भोईचे स्वत:चे एकही चित्र किंवा छायाचित्र उपलब्ध नसावे किंवा त्याच्या समकालीन लेखकाने, मित्राने किंवा शिष्याने त्याविषयी लिहिलेले नसावे ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

भीमा भोईचे तरुण आणि उत्साही समीक्षक भागीरथी नेपाक यांनी भीमा भोईच्या लिखाणातील अंतर्गत पुराव्यांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे आणि असे मत मांडले

आहे की, तो आंधळा नव्हता. त्यांनी तर्कशुद्धपणे असे मांडले आहे की, 'स्तुतिचिंतामणी'मध्ये भीमा जरी आपल्या जीवनाच्या आणि काळाच्या अनेक बाबींचे संदर्भ देत असला तरी तो आंधळा होता किंवा झाला असे निश्चितपणे कुठेही म्हणत नाही. 'स्तुतिचिंतामणी'मध्ये पुढीलप्रमाणे लिहिले आहे, ''मी रोज जंगलात गुरे राखीत असे. तहान-भूक लागल्यावर मी टेकडीवरील झऱ्याचे पाणी पीत असे. आकाशाकडे पाहात मी पुष्कळदा विचार करीत असे की, आता घरी जाण्याची वेळ झाली का? आज माझ्या नशिबात पेज असेल का? श्री. नेपाक म्हणतात त्याप्रमाणे खरोखर एखाद्या आंधळ्या मुलाला जंगलात गुरे राखणे किंवा त्याने वर वर्णन केल्या आहेत त्या गोष्टी करणे अवघड आहे.

ते भीमाच्या लिखाणातून खालील ओळीही उद्धृत करतात.

''मी कितीही लिहिले तरी या जगाची कथा संपत नाही. ताडाचे पान आणि खिळा हातात घेऊन मी आणखी किती पोथ्या लिहिणार आहे?''

('स्तुतिचिंतामणी' - 21वी बोली)

''पुढे किंवा मागे न पाहता गडबडीने मी या ओळी रचीत आहे. आणि त्या ताडाच्या पानावर लिहीत आहे.''

('कौतिसा')

''तुला माझी सगळी दुर्दैवी परिस्थिती माहीत आहे आणि माझ्या सगळ्या वेड्यावाकड्या बोलांमध्ये मी तुझ्या चरणांच्या कृपेची याचना करीत आहे.''

('कौतिसा')

श्री. नेपाक म्हणतात की, या तीन अवतरणांतून स्पष्ट होते की भीमा स्वतः त्या काळच्या पद्धतीप्रमाणे ताडपत्रावर लोखंडी खिळ्याने (stylus) लिहीत असला पाहिजे, हे म्हणणे योग्य वाटते. शिवाय भीमा 'स्तुतिचिंतामणी'मध्ये आणि त्याच्या भजनांमध्ये आपल्या स्वतःच्या पाहण्याविषयी आणि स्वतःच्या डोळ्यांविषयी अनेक वेळा उल्लेख करतो. आपल्या एका प्रसिद्ध भजनात तो म्हणतो, ''तुम्ही जर ते एक आणि एकमेव ब्रह्म पाहाल, तर तुम्ही अंध व्हाल. मी जे पाहिले आहे ते वर्णन करणेही मला शक्य नाही.'' 'स्तुतिचिंतामणी'च्या एकोणसाठाव्या बोलीमध्ये तो म्हणतो, ''माझ्या स्वतःच्या डोळ्यांनी पाहताना मी पुन्हा श्रेय विसरतो आणि अविद्येने घेरला जातो. जगाची भीती मला दडपून टाकते. आंधळ्या माणसाप्रमाणे चाचपडताना मी तुझ्या कृपेसाठी विनवणी करीत आहे.''

आंधळा माणूस स्वतःच्या उल्लेख अशा पद्धतीने करील हे पटणार नाही. 'स्तुतिचिंतामणी'च्या सव्वीसाव्या बोलीमध्ये तत्कालीन समाजाच्या ऱ्हासाविषयी सात्त्विक संतापाच्या भरात तो म्हणतो, ''माझ्या डोळ्यांना हे छप्पन्न कोटी लोक गवताच्या काड्यांसारखे वाटतात. एका क्षणात हे जग मी उलटवून दिलं असतं, पण माझ्या गुरूंची मला तशी आज्ञा नाही.'' दुसऱ्या एका ठिकाणी तो स्वतःला बोल लावतो आहे, ''आपली स्वतःची जीभ उपटतो आहे आणि आपल्या डोळ्यात काटकी खुपसतो आहे.'' बहुधा महिमा गोसावींच्या

निर्वाणानंतर रचलेल्या एका 'कौतिसा'मध्ये तो पूर्वी आपण कसे होतो आणि आता महिमा गोसावींच्या वियोगामुळे प्रत्येक गोष्ट आपल्याला कशी विरूप आणि उदास दिसते याचे वर्णन करतो. सारांश, भीमा भोईच्या सर्व उपलब्ध लिखाणातल्या अंतर्गत पुराव्यावरून असे मानणेच अधिक योग्य ठरेल की, आर्तबल्लव महंती आणि इतर अनेक विद्वान आणि समीक्षक म्हणतात तसा भीमा जन्मांध नव्हता. 'स्तुतिचिंतामणी'मध्ये इतके चरित्रविषयक आणि वैयक्तिक संदर्भ आहेत की भीमासारख्या आत्माविष्कार करणाऱ्या कवीने कोठेही आपल्या आंधळेपणाचा उल्लेख न करणे किंवा त्याविषयी खंत किंवा दुःख व्यक्त न करणे हे संभवत नाही. त्याने आपल्या आंधळेपणाचा उल्लेख केलाच असता किंवा त्याविषयी खंत किंवा दुःख व्यक्त केलेच असते. याउलट तो अंध नव्हता हे दर्शविणारे संदर्भ वर उल्लेखिल्याप्रमाणे अनेक आहेत.

श्री. नेपाक यांच्या मते महिमाधर्माच्या आणि अलेखपंथाच्याही प्रवक्त्याने भीमा आंधळा होता असा अर्थ लावला आहे किंवा वरील गुळमुळीत स्पष्टीकरण स्वीकारले आहे. याचे कारण असे की, त्यातून भीमाच्या आयुष्यातील धार्मिक प्रेरणा आणि दैवी कृपा यांचा प्रभाव अधिक ठसावा; त्यातून सिद्ध व्हावे की आपले गुरू महिमा गोसावी यांच्या कृपेने आणि प्रेरणेनेच एक आंधळा कोंढसुद्धा श्रेष्ठ दर्जाच्या कविता रचू शकला आणि लोकांपुढे गाऊ शकला. प्रत्येक धर्मामध्ये किंवा धर्मपंथामध्ये अतींद्रियवादावर किंवा धर्मश्रद्धेमुळे प्राप्त होणाऱ्या अतींद्रिय शक्तीवर सुप्त विश्वास असतो असे दिसते. वरील बाबतीत अशा प्रकारचा हेतू असणे अशक्य नाही. सारांशाने असे गृहीत धरणे योग्य ठरते की, भीमा लहानपणी गरीब व निराधार होता, त्याचे जीवन खडतर होते. तो गुरे राखून कशीबशी उपजीविका करीत होता पण तो जन्मांध नव्हता.

आणखी एका गोष्टीची नोंद घ्यायला हवी. धेनकनाल जिल्ह्याच्या जोरांदा खेड्यात किंवा त्याच्या आसपास कोंढ वस्ती नाही. तत्कालीन ऐतिहासिक कागदपत्रांतूनही एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात अशा वस्त्या तेथे असल्याचा पुरावा मिळत नाही. 'स्तुतिचिंतामणी'च्या प्रस्तावनेत प्रा. आर्तबल्लव महंती लिहितात की, भीमा भोईचा जन्म इ.स. 1855च्या सुमारास रायखोलजवळ झाला. पंडित विनायक मिश्रांच्या मते भीमा भोईचा जन्म इ.स. 1860मध्ये झाला आणि तो 1895 मध्ये मरण पावला. भीमा भोईच्या भजनातून असे उल्लेख आहेत की, गुरू महिमा गोसावींच्या आज्ञेप्रमाणे विशिष्ट कार्यासाठी त्याचा जन्म झाला. महिमा गोसावींच्या दैवी शक्तींच्या वरदानामुळे त्याला काव्य, भजने, विविध स्तुती, जनाना वगैरे रचण्याची शक्ती मिळाली. त्यातून त्याने सत्यमहिमाधर्माचा प्रसार साधला. भीमा भोईच्या भजनांमध्ये या वस्तुस्थितीचे अनेक उल्लेख सापडतात. 'उडिया साहित्यातील प्रातिनिधिक वेचे' (Typical Selections from Oriya Literature) मध्ये बी.सी. मुझुमदार म्हणतात, "भीमा भोईचा जन्म रायराखोल सरंजामी राज्यात गरीब कोंढ कुटुंबात झाला. त्याचा जन्मकाळ 1855 पूर्वी नसावा कारण 1895 मध्ये सोनपूर राज्यात खलियापालीमध्ये जेव्हा तो मरण

पावला तेव्हा तो, माझ्या अंदाजाप्रमाणे, वयाच्या चाळीशीतच असावा. वाचकांना ज्ञात आहेच की कोंढ हे आदिम जमातीचे आहेत आणि ते अशा प्रदेशात राहतात जिथे हिंदूंचा प्रभाव पोचत नाही. भीमा भोई हा उडिया कोंढ लहानपणी गुराख्याचे काम करीत असे.''

हे सर्व रूक्ष वादविवाद तात्त्विक आहेत आणि भीमाच्या कवितेचा योग्य आस्वाद घेण्यात या माहितीचा काहीच उपयोग नाही. त्यामुळे आपण एवढ्या माहितीवरून काही गोष्टी स्थूल-मानाने स्वीकारायला हरकत नसावी. उदाहरणार्थ, भीमा भोईचा जन्म 1846 ते 1850 या वर्षांच्या दरम्यान झाला आणि त्याचा स्वत:चा जीवनकाळही लहान म्हणजे पंचेचाळीस ते पन्नास वर्षे असावा. त्याच्या 'स्तुतिचिंतामणी'मध्ये त्याच्या बालपणातील दु:खे आणि वेदना, निरूद्देश भटकणे आणि अवहेलना यांचे करुण उल्लेख आहेत.

आपल्या खेड्यातल्या एका श्रीमंत माणसाची गुरे राखून वयाच्या बारा वर्षांपर्यंत भीमाने आपली उपजीविका केली असावी असे दिसते. पण हे फार काळ टिकणारे नव्हते. 'स्तुतिचिंतामणी'च्या 21व्या, 22व्या बोलीमध्ये किंवा सर्गामध्ये भीमाने आपले पोरकेपणाचे अनुभव पुढीलप्रमाणे नोंदले आहेत.

''हे परमेश्वरा, दुर्दैवाची तीव्रता मी लहानपणापासून अनुभवली आहे. हृदयकमलामध्ये सतत या गोष्टीचा विचार चालू असतो आणि त्यामुळे मला क्षणभरसुद्धा सुख लाभत नाही. जन्मापासूनच मी अगतिक आहे. माझे आई-वडील मला या जगात एकाकी टाकून निघून गेले. सुखाचे चार घास किंवा आनंदाचे दोन क्षण मिळावेत म्हटले तर ते कुठून मिळतील? डोळे पुसताना मला जाणवले की, डोळ्यातून अश्रू नव्हे तर रक्तबिंदू ओघळत होते. मी ज्या यातनांतून गेलो आहे त्या माझ्या श्रीगुरूवाचून कोणाला कळणार?

मी चार वर्षांचा झालो तेव्हा ज्येष्ठाच्या महिन्यात एकदा भगव्या रंगाची कौपीन धारण केलेला एक बैरागी गावात आला. त्याच्या दोन्ही हातांवर मला शंख आणि चक्राची चिन्हे स्पष्ट दिसली.''

भीमाचे आयुष्य एकाकी आणि उदास होते. आयुष्याच्या या काळात त्याला तोंडी रचना करण्याचा आणि त्या गात फिरण्याचा छंद लागला असावा. तरुण समीक्षक श्री. नेपाक यांच्या मते 'कौतिसा मधुचक्र' आणि प्रसिद्ध 'कौतिसा रासराकेली'मधल्या कविता भीमाने महिमापंथाचा स्वीकार करण्यापूर्वी केलेल्या असाव्या. त्यांच्यामध्ये लोकसाहित्याचा बाज आहे, त्या प्रदेशाच्या मातीचा गंध आहे आणि शारीरिक सुखाचे अप्रच्छन्न वर्णन आहे. या कवितांमध्ये राधेच्या कृष्णमीलनाच्या तीव्र ओढीचे वर्णन सर्व उत्कट तपशिलांसह केलेले दिसते.

भीमाजवळ काव्यप्रतिभा होती यात शंका नाही. महिमापंथामध्ये प्रवेश करण्यापूर्वीच स्थानिक परंपरा, आदिवासी लोकांची भाषा, वाक्यप्रयोग यांच्यावर त्याचे प्रभुत्व होते. या धर्मांतरामुळे त्याच्या कल्पनांची आणि विषयांची कक्षा वाढली आणि त्याच्या काव्यदृष्टीची आणि रचनांची क्षितिजे विस्तारली, यात शंका नाही. त्याच्यामध्ये निसर्गधर्मी काव्याची बीजे

होती आणि स्थानिक लोकांच्या जीवनपद्धती, आशाआकांक्षा यांच्याशी तो पूर्ण परिचित होता.

त्याने तीव्र दु:खभोग भोगले. पुस्तकांपेक्षा जीवनाच्या शाळेमध्ये त्याचे शिक्षण झाले. औपचारिक शिक्षण त्याला मुळीच मिळालेले नसावे. त्याच्या वेगवेगळ्या मुक्कामांमध्ये सवर्ण हिंदूंनी त्याची अवहेलना, मानभंग केलेला होता आणि कदाचित शारीरिक मारहाण केली असावी. त्याच्या 'कौतिसां'मध्ये त्याला मारहाण केल्याचे, दोराने बांधल्याचे आणि अपमानित केल्याचे उल्लेख आहेत. या सर्व कठीण परिस्थितीमध्ये त्याने महिमा गोसाव्यांचे आशीर्वाद मागितले आहेत.

भीमाच्या लिखाणामध्ये त्याच्या या दु:खी अनुभवांचे प्रतिबिंब उमटलेले दिसते. हा संतकवी कधी कधी क्रांतिकारकाच्या आवाजातही बोलतो. पण हा अशा क्रांतिकारकाचा आवाज आहे ज्याला समाजाच्या उद्धाराची आणि सर्वांच्या कल्याणाची तीव्र तळमळ आहे. ही क्रांती कोणत्याही वर्गाच्या वा जातीच्या विरोधात किंवा एखाद्या गटाच्या किंवा धर्मपंथाच्या विरोधात नाही. हा क्रांतीचा लढा प्रामुख्याने नैतिक मूल्यांच्या आणि वैयक्तिक प्रामाणिकपणाच्या ऱ्हासाविरुद्ध आहे आणि नैतिक मूल्यांच्या सखोल जाणिवेसाठी आहे. त्याच्या कवितांमध्ये दिसणारा ज्वलंत आत्मविश्वास आणि धैर्य संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी तळमळणाऱ्या प्रामाणिक आत्म्याचे प्रतीक आहे. काही वेळा त्याच्या लिखाणामध्ये तो प्रक्षुब्ध मन:स्थितीत समाजाला अध:पाताचा जाब विचारताना दिसतो. अशा परिस्थितीमध्ये कविता हा उत्स्फूर्त सहजोद्‌गार बनतो. पण प्रेम आणि करुणा यांनी उजळलेल्या त्याच्या काव्यस्वप्नाला त्यातून बाधा पोचत नाही. मानवतेबद्दल उत्कट प्रेम असल्याशिवाय खरा क्रांतिकारक निर्माण होऊ शकत नाही.

भीमाने शोकांतिका, वेदना, शोषण, मूर्तिपूजा आणि सामाजिक अध:पाताच्या विविध पातळ्या पाहिल्या आहेत. तो समाजाला आणि त्याच्या नेत्यांना तर जाब विचारतोच पण कित्येक वेळा आध्यात्मिक संघर्षाच्या उच्च पातळीवर तो सर्वशक्तिमान परमेश्वरावरही आरोप ठेवतो. आपले जीवन कायमचे नरकात गेल्याने जर जगाचा उद्धार होत असेल तर तेही करायची त्याची तयारी होती.

भीमा जन्माने कोंढ होता आणि त्याला कोंढ जीवनदृष्टीचा वारसा मिळाला होता हे आपल्याला लक्षात ठेवले पाहिजे. या जीवनदृष्टीची मूलतत्त्वे अलेखपंथापेक्षा फारशी वेगळी नाहीत. कोंढांमध्ये सामाजिकतेचे तीव्र भान असते. खरे म्हणजे प्रत्येक गोष्ट समाजाबरोबर अनुभवण्यावर त्याची श्रद्धा आहे. कोंढाचा आकाशातील परमेश्वरावर, धर्मावर आणि खाली धरित्रीदेवीवर विश्वास असतो. त्याच्या कवितेतील भावनिक वातावरणावरून असे दिसते की, तो एक साधा व अस्सल कोंढ आहे, त्याची दैवी न्यायालयावर भाबडी श्रद्धा आहे. शिवाय तिच्या जोडीला प्रामाणिकपणा आणि बांधवांविषयीचे प्रेम यांची वैयक्तिक जाणीवही आहे.

त्याच्यापूर्वीच्या अनेक उडिया कवींप्रमाणे (सरलादास त्या सर्वांमध्ये प्रमुख आहेत)

भीमाच्या जीवनाचा आणि लिखाणाचा मुख्य घटक म्हणजे तो आपल्या काव्यप्रेरणेचे व प्रतिभेचे श्रेय परमेश्वराच्या कृपेला देतो आणि त्यासाठी कृतज्ञता व्यक्त करतो. परमेश्वर आपल्या आवाजात जे बोलत असे तेच भीमाने लिहून काढले आहे असा विश्वास तो व्यक्त करतो. अशा रीतीने आपल्याला त्याच्यामध्ये पारंपरिक उडिया कवीचा नम्रतेचा भाव आणि दैवी कृपा हा सर्व निर्मितिक्षमतेचा उगम आहे असा विश्वास आढळतो.

1862 मध्ये शेजारच्या ग्रामदिहा गावात त्याची महिमा गोसावींशी भेट झाली असावी. आणि तो महिमापंथाकडे वळला असावा. असे म्हटले जाते की, 1862 मध्ये धेनकनालच्या कपिला टेकड्यांजवळ महिमा गोसावींना सिद्धी मिळाली आणि त्यानंतर लोकांमध्ये महिमा धर्माच्या संदेशाचा प्रसार करण्याच्या हेतूने ते बाहेर पडले. शेजारच्या फुलबनी जिल्ह्यातल्या बौधजवळ त्यांची गोविंदबाबांशी भेट झाली. हे गोविंदबाबा नंतर महिमापंथाचे निष्ठावंत अनुयायी आणि गोसावींचे निकटचे सहप्रवासी बनले. महिमा गोसावी आणि गोविंदबाबा यांच्या या भेटीला महिमा धर्माच्या इतिहासामध्ये मोठे महत्त्व दिले जाते. या भेटीनंतर महिमा- पंथाचे रूपांतर लोकप्रिय चळवळीत झाले. बौधहून महिमा गोसावी आणि गोविंदबाब रायराखोलला गेले आणि तेथे साधारण 1862च्या सुमारास ग्रामदिहा या छोट्या खेड्यात त्यांची भीमा भोईशी भेट झाली असावी असे दिसते.

महिमा गोसावींनी या अनपढ कोंढ मुलाला त्याच्या थोर काव्यशक्तीची जाणीव दिली व परमेश्वराच्या स्तुतीची गीते रचण्याची आणि गाण्याची प्रेरणा दिली. या घटनेने भीमा भोई या कोंढ मुलाच्या जीवनात आध्यात्मिक परिवर्तन झाले आणि त्याने अत्यंत सुंदर, मंत्रमुग्ध करणाऱ्या भजनांची मालिका रचायला प्रारंभ केला. सोळाव्या वर्षापूर्वीच त्याला महिमापंथाचा उद्गाता म्हणून मोठी प्रतिष्ठा मिळाली. दंतकथेनुसार, त्याच्या चार तरुण शिष्यांनी, विशेषतः हरि पांडा आणि वासुदेव पांडा यांनी, त्याने ब्रह्मानंदाच्या अवस्थेत गायिलेली गीते लिहून काढली. महिमा गोसावी आणि गोविंदबाबा प्रवास करीत करीत रायराखोलहून संबळपूरला आणि तिथून पश्चिम ओरिसामध्ये सोनेपूरला गेले. यातल्या प्रत्येक ठिकाणी त्यांचे अत्यंत उत्साहाने स्वागत झाले. पुढे 1863च्या उन्हाळ्यात ते कटकला गेले आणि कार्तिकाच्या शुक्ल पक्षात, आठगढजवळच्या खुंटणी येथे महिमा पूजेचा समारंभ साजरा झाला. या वेळपर्यंत महिमापंथाच्या अनुयायांची संख्या बरीच वाढली होती. पंथाचा विस्तार अत्यंत वेगाने कटक आणि पुरीच्या किनारी जिल्ह्यांमध्ये आणि विशेषतः खुर्दा आणि पतिया प्रदेशात पोचला होता.

गोविंदबाबांचे 1867 मध्ये दारूधेंगा नावाच्या दुर्गम खेड्यात निधन झाले. महिमापंथाच्या या थोर संघटकाचे निधन हा या पंथावरचा कठोर आघात होता. महिमापंथाने हिंदू धर्मातील अंधश्रद्धा आणि वेडगळ समजुती यांच्यावर हल्ला केला आणि त्यामुळे ब्राह्मणांचा आणि वैष्णवांचा काही प्रमाणात रागही ओढवून घेतला. असे दिसते की, 1873 मध्ये काही दुखावलेल्या लोकांनी टी.ई. रॅव्हेनशॉ या ओरिसा प्रदेशाच्या त्या वेळच्या आयुक्तांकडे निवेदन

दिले की, महिमा गोसावी प्रतिष्ठित कुटुंबातल्या स्त्रियांना भुरळ घालून महिमापंथाकडे आकृष्ट करीत असतात. दुसऱ्या एका दंतकथेनुसार महिमा गोसावींचे अनुयायी आणि इतरांच्यामध्ये या काळात निकराचा झगडा झाला होता आणि सरकार गोसावींना अटक करणार होते. पण या सर्व कथांचा खरेपणा सिद्ध करण्यासारखे काहीच ऐतिहासिक कागदपत्र उपलब्ध नाहीत. महिमा गोसावी क्योंझरकडे चालले होते पण वाटेत गंभीर आजाराने त्यांना घेरले आणि 1876 मध्ये धेनकनाल जिल्ह्यातल्या मढी किंवा कामाख्यानगर या खेड्यामध्ये त्यांचे देहावसान झाले. फाल्गुन महिन्यात शुक्ल पक्षाच्या दशमीला जोरांदा इथे त्यांचे दहन करण्यात आले. त्यानंतर जोरांदा हे महिमापंथाचे सर्वात महत्त्वाचे स्थान बनले.

महिमा गोसावींचा मृत्यू हा भीमा भोईला मोठाच धक्का होता. आपल्या भजनात भीमाने गोसावींना शून्य ब्रह्माचा अवतार मानले आहे. महिमा गोसावींच्या मृत्यूनंतर लगेच जोरांदा इथे महिमापंथाच्या दृढ संघटनाच्या आणि प्रसाराच्या योजनांची चर्चा करण्यासाठी बोलावलेल्या परिषदेला भीमा उपस्थित राहिला. व्यक्तिशः त्याला या चर्चा आवडल्या नाहीत, हे अगदी साहजिक होते. स्वतः सखोल धार्मिक आणि काव्यात्म प्रतिभा असलेल्या या निर्मितिक्षम श्रेष्ठ कवीला पंथाच्या शुष्क, आणि त्याच्या मते निरर्थक, कर्मकाडांत आणि तांत्रिक बाबीत रुतायचे नव्हते. त्याऐवजी त्याला पंथाचे प्राणतत्त्व मानवतावादी विचाराच्या कोंदणामध्ये गुंफून सामान्य माणसाला समजावून द्यायचे होते. जोरांदाहून भीमा बोलनगीर जिल्ह्यातल्या अंग नदीच्या काठी खलियापाली गावी गेला आणि तिथे त्याने आपल्या कार्यासाठी मठ उभारला. सोनेपूरच्या महाराजांनी त्याला मठ बांधायला परवानगी दिली. अशा रीतीने 1877 पासून खलियापाली आश्रम हे भीमा भोईच्या आध्यात्मिक सहकारी या अन्नपूर्णा यांच्या देखरेखीखाली महिमा धर्माचे सर्वात मोठे केंद्र बनले. सर्वसाधारणपणे महिमा तत्त्वज्ञानाच्या आणि भीमा भोईच्या अनुयायांना कुंभीपातिया असे म्हटले जाते. हे अनुयायी आपल्या कमरेभोवती कुंभी झाडाच्या सालाची दोरी बांधतात, त्यापासून हे नाव आले. अलेख किंवा कुंभपातिया यांच्या मूर्तिपूजेला कडवा विरोध असतो. ते निराकार परमेश्वराची उपासना करतात, त्याला ते अलेख म्हणतात. भीमा भोईची प्रवचने एकेश्वरवादी आहेत. त्याच्या मूर्तिपूजेवरील हल्ल्यामुळे त्याच्या काही अनुयायांना वाटू लागले की, जगन्नाथाची पूजा हा हिंदू धर्मातील सर्व अंधश्रद्धांचा उगम आहे. असे वाटते की, 1881 मध्ये संबळपूर प्रदेशातून कुंभीपातिया पुरीला आले आणि त्यांनी जगन्नाथ पंथातील मूर्तिपूजेच्या पद्धतीविरुद्ध निदर्शने केली तेव्हा संघर्ष किंवा हिंसेचा प्रकार झाला असावा. बारा पुरुष आणि तीन स्त्रियांच्या नेतृत्वाखाली कुंभीपातियांनी मिरवणूक काढली. सर्वजण 'अलेखाचा विजय असो' अशा घोषणा देत होते. असे सांगितले जाते की, ते देवळाच्या दरवाज्याजवळ आले, भोग मंडपाची दारे त्यांनी उघडली आणि जगमोहनाच्या महालात प्रवेश केला. त्यांच्या पुढचा जयविजय दरवाजा बंद केला गेला म्हणून ते दुसरे प्रवेशद्वार शोधण्यासाठी धडपडू लागले. पांडांनी प्रखर प्रतिकार केला. एक कुंभीपातिया खाली पडला आणि झालेल्या झटापटीत मरण पावला. बी.सी. मुझुमदारांच्या मताप्रमाणे

कुंभीपातियांना जगन्नाथाच्या पूजेवरील हल्ल्याची प्रेरणा भीमा भोईकडून मिळाली.

पण या आरोपाला आधार देणारी अधिकृत कागदपत्रे उपलब्ध नाहीत. सी. ई. बकलँडच्या 'लेफ्टनंट गव्हर्नरांच्या अंमलाखालील बंगाल' ('Bengal Under the Lieutenant Governors') या पुस्तकात हा प्रसंग वर्णन करतात पण भीमा भोईचा उल्लेख त्यात करीत नाहीत. एका समकालीन वृत्तपत्राच्या, 'उत्कलदीपिका'च्या, 13-3-1881च्या आवृत्तीत खालील मजकूर सापडतो. (भाग 16, क्र. 11)

"गेल्या दोन आठवड्यात अशी अफवा पसरली आहे की, पुरीमध्ये स्थानिक केलागारुड्यांसारख्या भटक्या लोकांनी शिजवलेल्या भाताची भांडी घेऊन जबरदस्तीने जगन्नाथाच्या देवळात प्रवेश केला. त्यावेळी मुख्य देवळात देवाचा भोग चढवला जात होता. त्यामुळे रक्षकांनी घुसखोरांना अडवण्याचा प्रयत्न केला. यातून रक्षक आणि घुसखोर यांच्यात झटापट सुरू झाली. त्यामध्ये एक घुसखोर जागीच ठार झाला. इतरांनी बरोबर आणलेला शिजवलेला भात देवळाच्या आवारात फेकला. त्यातून देवाचा भोग बिघडवला. त्यांनी पुजाऱ्यांना धमक्याही दिल्या की, ते देवाला म्हणजे त्याच्या लाकडी मूर्तीला आग लावतील आणि ती राख आपल्या अंगाला फासतील. नंतर ते निघून गेले. अशा रीतीने थोड्याच वेळात फौजदारी कायद्याने दखलपात्र असे गुन्हे घडले असावेत पण कोणाला अटक झाल्याची किंवा गुन्हेगारांविरुद्ध काही कृती केल्याची अधिकृत बातमी नाही. पण या अफवांमध्ये काही तथ्य असेल तर ती बाब गंभीर म्हणावी लागेल."

श्री. एन्.एन्. बसूंचे मत असे आहे की, भीमाने अलेखपंथाच्या अनुयायांचे संमेलन बोलावले होते कारण त्याने दैवी भविष्यवाणी ऐकली होती की महिमा पंथातून भगवान जगन्नाथाचे सुप्त बुद्ध रूप प्रकट होईल. श्री. बसू दंतकथांचा हवाला देऊन सांगतात की, जवळजवळ तीस खेड्यातले लोक पुरीला जमले होते. पुरीचे महाराज स्वागत करायला तयार होते पण नंतर असे निष्पन्न झाले की भीमाचे अनुयायी लाकडी त्रिमूर्ती नष्ट करण्याच्या बेतात होते. त्यातून त्यांना निराकार निरंजनाचे श्रेष्ठत्व हेच अंतिम सत्य असे प्रस्थापित करायचे होते. श्री. बसूंच्या मते यातूनच भीमाच्या उपस्थितीत हिंसक झटापट आणि रक्तपात झाला असावा. भीमाला आपल्या साहसाचे वैयर्थ जाणवले आणि त्याने आपल्या अनुयायांना हिंसेच्या मार्गापासून परावृत्त होण्याचा उपदेश केला. त्याने असे सांगितले असे म्हणतात की, भगवान जगन्नाथ बुद्धाच्या रूपाने पूर्वीच पुरी सोडून गेले आहेत आणि म्हणून हा झगडा निष्फळ आहे.

हिंसेचे हे नाट्य पार पाडल्यावर त्याच्या पुष्कळ अनुयायांना तुरुंगात टाकले गेले. काहींनी ब्रिटिशांपासून बचावण्यासाठी शेजारच्या माजी संस्थानात पळून जाऊन आश्रय शोधला. अलेख पंथाच्या पराभवाच्या या क्षणी भीमाने धीर आणि सहनशीलता दाखवली व धर्माच्या रक्षणासाठी स्वार्थत्याग करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला.

बसूंच्या या सर्व विधानांचा मेळ अधिकृत किंवा देवळातील दस्तऐवजांशी बसत नाही.

तत्कालीन कागदपत्रातही अशा विधानांचा उल्लेख नाही. भीमा भोईच्या स्वतःच्या लिखाणामध्येही या प्रसंगाचा काहीही निर्देश नाही. असे काही घडलेच असेल तर सत्य, सहिष्णुता आणि अहिंसा यांच्या एका प्रचारकाने अशा काही प्रसंगाला मार्गदर्शन केले असेल किंवा तो दूरान्वयानेही जबाबदार असेल हे पूर्णपणे असंभाव्य वाटते. याउलट बलरामदास आणि जगन्नाथदास यांच्यामते भीमा भोई हा भगवान जगन्नाथाचा भक्त होता आणि जगन्नाथदासाच्या 'भागवता'तील दीर्घ उताऱ्यांचे पठण करण्याची त्याला आवड होती, हे दाखवणारे पुरावे मिळतात. वस्तुस्थिती अशी आहे की, जगन्नाथ तत्त्वज्ञानाची काही तत्त्वे, महिमापंथाच्या संकल्पना व कल्पना यांमध्ये सांगड घालण्याचे श्रेय भीमाचे होते. भगवान जगन्नाथाच्या पूजेविरुद्ध झालेल्या ज्या हिंसक निदर्शनांचा उल्लेख झाला आहे त्यांची प्रेरणा भीमाचे अनुयायी म्हणवणाऱ्या काही बेजबाबदार आणि माथेफिरू लोकांनी दिलेली असावी अशी शक्यता आहे. मात्र अलेखपंथाच्या अनुयायांनी आपल्या जीवनात स्वयंशिस्त, पवित्र वर्तन आणि आंतरिक विशुद्धता अंगी बाणवावी असे भीमा भोईला वाटत होते.

भीमा भोई खलियापालीमध्ये संन्याशाचे जीवन जगला नाही. तो प्रार्थना आणि प्रवचने करीत असे, गीतरचना करून गात असे. त्याला आपल्या अनुयायांच्या आणि भक्तांच्या सहवासात आनंद वाटत असे. या पलीकडे त्याच्या जीवनेतिहासाबाबत फारशी माहिती मिळत नाही. ऐहिक आणि आध्यात्मिक जीवनामध्ये समन्वय साधण्याचा त्याने प्रयत्न केला. त्याच्या आध्यात्मिक सहकारी मा अन्नपूर्णा या आश्रमातील एक मोठी आध्यात्मिक शक्ती होत्या. भीमाच्या आणखी चार शिष्या होत्या असे दिसते. पण समकालीन कागदपत्रांतून याला ऐतिहासिक पुरावा मिळत नाही. दुर्दैवाने त्याच्या या स्त्रियांशी असलेल्या संबंधाविषयी काहीच माहिती मिळत नाही. त्यांची व्यक्तिमत्त्वे किंवा त्यांचा त्याच्यावरील प्रभाव याविषयीही काही माहिती मिळत नाही. त्याच्या भजनांमध्ये वा इतर रचनांमध्ये त्यांचा फारसा उल्लेख येत नाही. 1892 मध्ये भीमा भोईला एक कन्या आणि एक पुत्र यांचा लाभ झाला. त्यांची नावे लावण्यवती आणि कपिलेश्वर अशी ठेवली होती. भीमा भोई वयाच्या फक्त 45 किंवा 46 व्या वर्षी 1894 मध्ये मरण पावला. त्याचे सर्व सहकारी विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात मरण पावले. भीमाच्या मुलांनी तापसी जीवन व्यतीत केले व ती 1935-36 मध्ये मरण पावली. त्याच्या कुटुंबातील प्रत्येकाच्या सन्मानासाठी समाधी मंदिर बांधले गेले.

2.

परंपरा, महिमा धर्म आणि भीमा भोई

भीमा भोईच्या लेखनाचा विचार महिमा धर्माच्या तत्त्वज्ञानातील कल्पनांच्या आणि या धर्माची ओरिसातील दीर्घ तात्त्विक आणि धार्मिक परंपरेतून जी उत्क्रांती झाली तिच्या संदर्भात केला पाहिजे. प्रचलित काळातील महिमा धर्माचे बहुधा सर्वात श्रेष्ठ गुरू विश्वनाथ बाबा यांनी मठातील कठोर शिस्तीवर भर दिला होता. संन्याशांसाठी पदांची श्रेणीव्यवस्था सुरू केली. विश्वनाथ बाबांनी महिमा धर्माची शिकवण सुव्यवस्थित मांडली आणि तिला तात्त्विक संकल्पनात्मक चौकट देण्याचा प्रयत्न केला. तर महिमापंथानेच जुने ग्रंथ आणि भीमा भोईच्या साहित्यकृती मुख्यत: मध्ययुगीन भक्तिवाङ्मयाच्या प्रकारात मोडणाऱ्या होत्या. भीमा भोईच्या लेखनात महिमापंथाच्या संकल्पना शुष्क बौद्धिकतेकडून भावनिक जाणिवेकडे आणि आत्मिक आविष्काराकडे वळल्या. त्याचे लिखाण तात्त्विक चिंतनापेक्षा मध्ययुगीन गूढवादाकडे झुकणारे होते. साहजिकच ते ग्रामीण समाजात अधिक लोकप्रिय होते.

मात्र महिमा धर्माची मुख्य शिकवण आणि श्रद्धा याविषयी इथे थोडे स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. एस्कमानच्या मताप्रमाणे ''महिमा धर्म शून्याची बुद्धवादी संकल्पना घेतो आणि तिचा मेळ हिंदू परमब्रह्म आणि ईश्वर पुरुषाशी घालतो. शून्य परमब्रह्म अधिक नेमकेपणाने व्यक्त करण्यासाठी पुढील संकल्पनांचा उल्लेख करता येईल. अलेख, निर्गुण, निराकार, अनादी, निरंजन, महिमा या सर्व संकल्पना मध्ययुगीन उडिया साहित्यात शून्य ब्रह्म वर्णन करण्यासाठी वापरल्या गेल्या आहेत किंवा त्या परमेश्वरासाठी वापरल्या जाणाऱ्या संज्ञा आहेत.''

शून्य ही संकल्पना हिंदू तत्त्वज्ञानाच्या वेगवेगळ्या पंथांत आणि धार्मिक परंपरांमध्ये वापरली जात असे. बौद्ध धर्मातील शून्य संकल्पनेचेही वेदान्तातील अशाच तत्त्वाशी नाते आहे. बौद्ध धर्माच्या महायान पंथाने या तत्त्वाचे नकारात्मक संकल्पनेतून सकारात्मक संकल्पनेमध्ये रूपांतर केले. व त्यातून निसर्गातील आणि भौतिक जगातील सर्व आविष्कारांमागची अंतिम वास्तवता सूचित केली. या संकल्पनेचे रूपांतर अखेर अनेक दुर्बोध धार्मिक पंथांत झाले आणि विशेषत: ओरिसातील वैष्णववाद हे त्याचे ठळक रूप. शेवटी शून्य हासुद्धा एका साकार दैवताचा गुणधर्म मानला गेला. व भक्ती हा त्याच्या प्राप्तीचा मार्ग ठरला. या साकार दैवताचे वस्तुत: दोन गुणधर्म मानले गेले - कोठेही नसणे आणि सर्वत्र भरून असणे. हा व्यामिश्र प्रतीकवाद

होता पण त्यातून एक गोष्ट विशेषत्वाने स्पष्ट केली गेली. या अंतिम वास्तवतेनेच दृश्य जगताला अर्थ आणि स्वत्व प्राप्त होते. कारण त्याला स्वत:ला काही आकार किंवा रूप नसते. हे स्पष्ट करण्यासाठी काही वेळा अग्नी आणि त्या अग्नीने पेटलेली वस्तू यांचे प्रतीक वापरले जाते. हवेप्रमाणेच अग्नीला लौकिक अस्तित्व, विस्तार, आकार किंवा रूप नाही. अग्नी जळणाऱ्या वस्तूचा आकार आणि रूप धारण करतो. उच्च कोटीचे ज्ञान म्हणजे जाळणाऱ्या वस्तूचे रूपांतर जाणणे नव्हे तर अग्नीचे अस्तित्व जाणून घेणे. असंख्य भौतिक आणि इंद्रियांच्या संवेदना म्हणजे फक्त रूपांतराचे रंग आहेत, ते अंतिम सत्याचे घटक नाहीत. अंतिम सत्याला आदि नाही आणि अंत नाही, ते रूप आणि आकार यांच्या अतीत आहे. साकार दैवताला प्राप्त करण्यासाठी होणाऱ्या तळमळीतील मानसिक अवस्था आणि भावनिक आंदोलने मध्ययुगातील 'पंचशाखा' नावाच्या साहित्यिक पंथात सविस्तरपणे व्यक्त झालेली आहेत. या साकार दैवताचे जे गुणधर्म वारंवार वर्णन केले जातात ते म्हणजे शून्य, अलेख, अनादि, निराकार आणि तेच परमब्रह्म किंवा शून्यब्रह्म असे म्हटले जाते. मोक्ष म्हणजे आत्म्याचे भक्तीच्या मार्गाने अंतिम सत्याशी मीलन. हे मीलन कोणतेही बाह्य उपचार, वर्तनाचे ठराविक नियम, तीर्थयात्रा किंवा मूर्तिपूजा यांच्याद्वारे साध्य होत नाही तर चिंतनाच्या मार्गानेच साध्य होणारे आहे.

महिमापंथाचे संस्थापक महिमा स्वामी यांचा जन्म ओरिसामध्ये इ.स. 1826 मध्ये झाला असावा असे मानले जाते. महिमा स्वामींनी ज्या तत्त्वज्ञानाचा प्रचार केला त्यातील मुख्य शिकवणीविषयी किंवा स्वत:विषयीसुद्धा काहीही लिहून ठेवलेले आढळत नाही. या पंथाच्या तात्त्विक आणि ऐतिहासिक अंगांचे सुसूत्रीकरण आणि नोंद करण्याचे काम विश्वनाथबाबांनी केले व पंथाची मूलभूत शिकवण उत्कट आणि हृदयस्पर्शी काव्यातून व्यक्त करण्याचे काम विश्वनाथबाबांनी केले. भीमा नसता तर महिमा धर्म फार तर शून्य, आकारहीन विश्व, कालहीन व्यक्तित्व अशा फक्त निवडक शिष्यांनाच समजू शकणाऱ्या कल्पनांनी भरलेला एक दुर्बोध तात्त्विक पंथ म्हणून शिल्लक राहिला असता. त्या स्वरूपामध्ये सामान्य माणसाला त्याचे आकर्षण वाटणे शक्यच नव्हते. सत्यमहिमा धर्माच्या मध्यवर्ती तात्त्विक कल्पना आणि त्याचा इतिहास विश्वनाथबाबांच्या चार मुख्य ग्रंथात चर्चिलेला आहे. ते ग्रंथ म्हणजे 'सर्व वेदवेदान्त सारतत्त्व शिरोमणि अलेख, परब्रह्म दर्शन', 'सत्यमहिमाधर्मप्रतिपादक', 'भागवत सारसत्यधर्म' आणि 'सत्त्वमहिमा धर्म इतिहास'.

महिमापंथाच्या शुष्क कल्पना आणि संकल्पना भीमाच्या काव्यात्म उद्गारांमधून ओरिसामधील लाखो लोकांच्या हृदयात घर करून राहिल्या. त्याच्या काव्यशक्तीमुळे इतरही राज्यात त्यांचा प्रसार झाला. महिमा धर्माचे भक्त ज्या सामुहिक प्रार्थना करतात, त्यामध्येच नव्हेतर या पंथाचे औपचारिकपणे जे अनुयायी नाहीत अशा भक्तांच्याही प्रार्थनांमध्ये भीमाची गीते, जनाना आणि भजने यांच्या संग्रहाचा प्रभाव दिसून येतो. आजसुद्धा ओरिसातल्या दुर्गम खेड्यात संध्याछाया पसरत असताना भागवत टुंगीमध्ये, सामुदायिक सभागृहात,

तंबोऱ्याच्या साथीने गायल्या जाणाऱ्या भजनांमध्ये भीमा भोईची भजने असतात. अशा एखाद्या सामूहिक प्रार्थनेमध्ये भाग घेणे म्हणजे खरोखर आध्यात्मिक किंवा काव्यात्म अनुभव घेणे असते. माणसाला उच्च अशा आध्यात्मिक प्रदेशामध्ये नेण्याचे सामर्थ्य या स्वरांमध्ये आहे. या प्रदेशामध्ये अशाश्वत आणि अनंत, स्थळ आणि काळाच्या सीमित पर्यावरणामध्ये विलीन होऊन जातात. व्यक्तिगत दु:ख आणि शोकांतिका उच्च वास्तवाच्या वैश्विक संगीतामध्ये मिसळून जातात. यामागची प्रेरणा भीमाची असते. औपचारिक उच्च शिक्षणाची किंवा संस्कृत विद्वानांच्या शिक्षणाची पुण्याई पाठीशी नसताना भीमाने उडिया भाषेला उत्कृष्ट, हृदय हेलावून टाकणाऱ्या काव्याची देणगी दिली. विश्वनाथबाबा हे अलेख वा महिमापंथाचे या शतकातले सर्वात श्रेष्ठ उद्‌गाते आहेत, याचा उल्लेख वर आला आहेच. त्यांच्या चार मुख्य ग्रंथांमध्ये महिमापंथाच्या तत्त्वज्ञानाबरोबरच भीमाचे जीवन आणि त्याचा काळ यांच्याविषयी माहिती मिळते. ते त्याला शून्यवादाच्या उडिया तात्त्विक परंपरेमध्ये मानाचे स्थान देतात. कै. लक्ष्मीनारायण साहू यांचे प्रतिपादन असे होते की, ''महिमापंथातील शून्यवाद आणि बौद्ध धर्मातील शून्यवाद वेगळे आहेत. त्यांच्या मते बुद्धाच्या शून्य संकल्पनेत अंतिम सत्य काहीही नाही, पण अलेख संकल्पनेमध्ये सर्व दृश्यविश्व अदृश्य झाल्यानंतर फक्त एक तत्त्व शिल्लक राहते. तेही अदृश्य असते.'' हा अतिशय महत्त्वाचा व लक्षवेधी विचार आहे आणि भीमाच्या साहित्यातील शून्यसंकल्पनेशी मिळताजुळता आहे. शून्य म्हणजे पूर्ण नकार, निखळ अविद्या वा निरस्तित्व नव्हे. ते फक्त दृश्य गोष्टींचे, स्थित्यंतराचे नष्ट होणे असते. कारण ती अस्तित्वाची विशुद्ध अवस्था आहे. तिच्या स्थित्यंतराच्या विविध पातळ्या म्हणजे केवळ विविध रूपे किंवा आविष्कार किंवा परिवर्तने आहेत.

शून्यवादाची साहित्यातील आणि तत्त्वज्ञानातील परंपरा दीर्घ आहे, हे अगदी स्पष्टच आहे. शून्यवाद हा मुख्यत: गूढवादी जीवनदृष्टीचा भाग होता आणि बौधगण ओ दोहा काळापासून उडिया साहित्यात त्याचे वर्चस्व होते. उदाहरणार्थ सिद्धाचार्य कान्हूपाने दैवी प्रेरणा लाभलेल्या व्यक्तिगत मानसिकतेचा उत्कट व आंतरिक अनुभव प्रतीकांच्या भाषेत व्यक्त केला आहे. काही ठिकाणी ही प्रतीके दुर्बोधही होतात.

भीमा भोईच्या लिखाणाला महिमा किंवा अलेखपंथामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. अलेख पंथाची शून्य कल्पनेवर श्रद्धा आहे. तिच्यावर त्यांची अनेक गीते आहेत पण संकल्पना म्हणून पाहता बौद्ध धर्मातील शून्य संकल्पनेपेक्षा ती वेगळी आहे. बौद्ध धर्माने कर्मयोगावर सर्वोच्च भर दिला, जन्ममृत्यूच्या चक्रातून मुक्ती मिळवण्याची शक्ती मानवी प्रयत्नातच आहे असे मानले. हिंदू आणि ख्रिश्चन धर्मात जसे परमेश्वरी कृपेला अतिशय महत्त्व दिले आहे तसे बौद्ध धर्मात दिलेले नाही. त्यामुळे अंतिमत: तो कर्मयोगाचाच एक प्रकार होता. तो मालरोच्या 'कर्मातून मोक्ष' या कल्पनेशी मिळताजुळता आहे आणि बौद्ध धर्मात त्याचा अर्थ 'निर्वाण' असा आहे. त्याचे मूळ अशा श्रद्धेत होते की, हे जग दु:खांनी भरलेले आहे आणि जीवनाचे उद्दिष्ट जन्म-मृत्यूच्या चक्रातून मुक्ती मिळवणे हे आहे. ब्रह्म अथवा अतींद्रिय सत्याबद्दल

बुद्ध काही बोलत नाही. अलेखपंथामध्येही शून्यावर असाच भर आहे. बौद्ध धर्मामध्ये कालांतराने महायान हा पंथ निर्माण झाला व हळूहळू त्याचा सहजयान किंवा ज्याला सहजिवा म्हणत असत अशा पंथात ऱ्हास झाला. कालांतराने महायान पंथावर शैव आणि वैष्णव तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडला. नागार्जुनांनी ब्राह्मण आणि श्रमणांच्या कृती एकत्र आणण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी आपल्या तत्त्वज्ञानात आणि शिकवणीत योग व भक्ती यांचाही स्वीकार केला होता. ब्रह्मा, विष्णू आणि महेश या हिंदूंच्या प्रमुख उपास्य देवता आणि तारासुद्धा स्वीकारली गेली. हळूहळू बौद्ध धर्मामध्ये शक्तिपूजा किंवा मातृपूजा सुद्धा सुरू झाली. नंतर शक्ती आणि आदिबुद्ध यांच्या एकत्र येण्यातून कालचक्राचे तत्त्वज्ञान आणि संसाराची कल्पना निर्माण झाली. या दोन्ही गोष्टी महायान पंथात शिरल्या. कालचक्र तत्त्वज्ञानाच्या प्रभावाखालील बौद्धांनी असे मानण्यास सुरुवात केली की ज्या शून्य पुरुषाला निरंजन (म्हणजे पूर्णतया विशुद्ध) असे म्हणतात त्यानेच आदिशक्तीच्या आद्य ऊर्जेतून ब्रह्मा, विष्णू आणि महेश्वर यांची निर्मिती केली. त्यामुळे एक प्रकारे कालांतराने सहजयान तत्त्वज्ञान वैष्णववाद तत्त्वज्ञानामध्ये मिसळून गेले, याचा प्रत्यय आपल्याला बंगाली कवी चंडीदास याच्या साहित्यात मिळू शकतो. अलेख पंथामध्ये आपल्याला शून्य कल्पना, योग्य कर्मातून मुक्ती यांच्याप्रमाणेच शून्य पुरुष, कालचक्र याही कल्पना आढळतात.

उत्तरकालीन बौद्ध धर्माप्रमाणे अलेखपंथामध्येही शून्य, निरंजन, अलेख, ब्रह्म आणि आदिमाता ही अंतिम सत्य वर्णन करण्यासाठी वापरलेली नामाभिधाने आहेत. आपल्या 'स्तुतिचिंतामणी'मध्ये भीमा भोईने कालचक्राचा विशेषकरून उल्लेख केला आहे. भीमाने ब्रह्मालासुद्धा 'सहज आनंद' असे म्हटले आहे.

उडिया साहित्याच्या इतिहासात सत्य म्हणजे महाशून्य अलिखित शब्द, निरंजन आणि अव्यक्त असे मानण्याची दीर्घ परंपरा आहे. या सत्याच्या वर्णनासाठी वापरलेली इतर काही अभिधाने म्हणजे अनाकार, शून्य पुरुष, अव्यक्त, महाशून्य, अलेख, निराकार आणि अनादि. सरला दासांच्या 'महाभारता'पासून बलराम दासांचे 'ब्रह्मानंद भूगोल', 'विराटगीता', जगन्नाथ दासांचे 'तुलाभीना', अच्युतानंद, दीनकृष्ण आणि आराखिता दास आणि इतर अनेक गौण साहित्यिकांच्या कृती या सर्व साहित्यकृतींची दीर्घ शृंखला पाहिली असता अंतिम सत्याचे वर्णन अरूप, अनंत, अनादि, निराकार, निर्गुण इत्यादी प्रकारेच केलेले दिसते. सरला 'महाभारता'त परमेश्वराचा उल्लेख खालील ओळीत दिसतो –

जयतु अनादि अभय निराकार
अनाहत पुरुष तू अनाकार ज्योती.

बलराम दासांच्या 'विराट गीते'मध्ये आपल्याला खालील ओळी आढळतात –

महाशून्यारू शून्य हेला
से शून्य प्रणव जन्मिला
प्रणव अरूयार संभूत जीव परम दुशन्त.

(महाशून्यातून शून्य निर्माण झाले. शून्यातून ओंकाराचा जन्म झाला. या ओंकारातून जीव आणि परमाप्रमाणे अक्षरे निर्माण झाली.)

पंचशाखा पंथाच्या अच्युतानंदांनीसुद्धा एकाक्षर ब्रह्माचे, एकमेव आणि अविनाशी ब्रह्माचे वर्णन केले आहे. त्यांनी 'ब्रह्माचे 'अलेख स्वरूप' असेही वर्णन केले आहे.

पंचशाखांची काव्ये म्हणजे गूढवादी साहित्याच्या दृष्टिकोनातून रचलेल्या बहुधा सर्वाधिक सृजनशील कृती होत्या. पंचशाख असे नाव असलेल्या पाचजणांपैकी जगन्नाथदास आणि बलरामदास हे सर्वात महत्त्वाचे होते आणि त्यांच्या काव्यात गूढवादाची एवढी तीव्रता व व्याप्ती प्रकट झाली की उडिया काव्यातल्या सर्वात सृजनशील कालखंडामध्ये पंचशाखांचीही गणना होते. त्या काळामध्ये शून्यवादाचा सर्वाधिक प्रभाव होता. अंतिम सत्याच्या संकल्पनेचे शून्य पुरुष किंवा निराकार असे जे वर्णन आहे, त्यावर शून्याच्या बौद्ध कल्पनेचा प्रभाव पडलेला असावा पण हा शून्य पुरुष म्हणजे जागृती आणि शक्ती यांचे साकार रूप असावे. उदाहरणार्थ, पंचशाखांपैकी एक दुय्यम कवी अच्युतानंद यांनी शून्यपुरुषाचे पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे.

''तो निरंतर अनासक्त असतो. आणि तरीही सर्व भ्रमांचा निर्माता तोच आहे. तो चिरंतन कृपामय आहे आणि तो सर्व अशाश्वत मृत्तिका शरीरामध्ये विराजमान आहे. त्याला सर्व दंभ आणि दुष्टपणाचे ज्ञान असते. तो आपल्याला शून्यामध्ये ठार करतो आणि तरीही देवत्वाच्या मार्गाकडे नेतो. तो एकमेव या मिथ्या विश्वात राहतो आणि आपल्या लीला दाखवतो.''

अशा रीतीने मध्ययुगातल्या वैष्णव साहित्यामध्ये शून्यकल्पना पोकळी किंवा निरस्तित्व अशा बौद्ध धर्मातील अर्थाने वापरलेली नाही. शून्य कल्पना म्हणजे अस्तित्व, प्रत्यक्ष व्यक्तिमत्त्व होते, सर्वशक्तिमान आलेख पुरुषच तिच्यातून सूचित होत असे. उदाहरणार्थ, 'विष्णुगर्वपुराणा'त वैष्णव कवी चैतन्यदास अलेख पुरुषाची संकल्पना अगदी अच्युतानंदांच्याच पद्धतीने व्यक्त करतो, ''त्याचा आकार म्हणजे पूर्ण शून्य आहे आणि तरीही तो हे प्रचंड शून्य आपल्या अस्तित्वाने भरून टाकतो आणि या अर्थाने तो सर्वव्यापी आहे. शून्यामध्ये त्याचा निवास आहे. आपल्या शून्यत्वातूनच तो सर्व ग्रहांमध्ये फिरतो.''

साधारणपणे पंचशाख म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पाच उडिया कवींनी जीव, त्याच्या मुक्तीचा शोध आणि जीव आणि शिव यांच्यातील संबंध यांच्याविषयीच्या आपल्या कल्पना सामान्यत: गृहीत असलेल्या अनेक प्रतिमांच्या किंवा रूपकांच्या आधारे मांडल्या. पिंडब्रह्मांडाचा सिद्धान्त हे असेच एक विस्तृत रूपक होते. पंचशाखांच्या काव्यातील गूढवाद पुरुष आणि प्रकृती यांच्या संबंधाच्या उत्कट आणि सुसंस्कृत वर्णनावर आधारित आहे. इथे जीव आणि शिव यांची तुलना राधा व कृष्णाशी केलेली आहे. आणि शून्य म्हणझे रासक्रीडेचे अथांग क्षेत्र आहे, निरस्तित्व नाही. ते कधी वृंदावन तर कधी गोलोक असे अनंतरूपी अस्तित्व आहे, तिथे परमात्मा आपली क्रीडा करीत असतो. निरंतर नूतनीकरण, सततचे विसर्जन आणि तरुण होण्याचे नाट्य, जन्म व मृत्यूचे अनंत चक्र, जीव आणि शिवाच्या चिरंतन आंतरिक

संबंधातून फुलणारे नाट्य यांची परमेश्वरी लीला या रंगमंचावर चाललेली असते. पंचशाखा साहित्यात दैवताच्या प्राप्तीच्या ओढीतून निर्माण होणारी मानसिक अवस्था आणि भावनिक स्थिती सविस्तर व सखोलपणे वर्णन केलेली दिसते. मोक्ष म्हणजे जीवाचे भक्तीच्या मार्गाने शिवाशी झालेले मीलन. ते बाह्य उपचारांनी किंवा तीर्थयात्रांनी साध्य होत नाही तर उत्कट चिंतनातून जाणिवेच्या सर्व द्वारांच्या विशुद्धीकरणाहून साध्य होते. बौधगण ओ दोहा, पंचशाख आणि मध्ययुगीन वैष्णव यांच्या काव्यातील परंपरेचा उत्कट आविष्कार भीमा भोईच्या लेखनात दिसतो. आपल्या 'स्तुतिचिंतामणी' ग्रंथातून आणि भजनातून भीमाने केवळ वैयक्तिक मोक्षाच्या गूढवादी कल्पनांचेच नव्हे जर समाजातील माणसाच्या खडतर नियतीपासून उद्धाराचेही समर्थ चित्रण केलेले आढळते. त्याच्या काव्यामध्ये पंचशाख साहित्याची तात्त्विक चिंतनशील प्रवृत्ती तर दिसतेच शिवाय गोपालकृष्ण वनमाळी किंवा कविसूर्य यांच्यासारख्या त्याच्यापूर्वीच्या कवींच्या काव्यातील उत्कटता आणि गेयताही आढळते. महिमा पंथाचा गाभाच भीमाच्या खालील प्रसिद्ध संगीतमय ओळीतून प्रकट झालेला दिसतो. मानवतेला वाचवण्यासाठी आपला आत्मा नरकातही विलीन करण्याची कवीची तयारी आहे.

''अमर्याद आहे या जीवनाचे दुःख आणि दुर्दैव! हे कोण पाहू शकेल? कोण साहू शकेल?

माझा आत्मा नरकात पिचत राहिला तरी चालेल पण या विश्वाचा उद्धार होऊ दे.''

भीमा भोई स्वतःला मूल समजत असे आणि अगदी लहान मुलाप्रमाणे त्याला अस्तित्वाचे गूढ जाणून घेण्याची इच्छा होती. उडिया काव्यातील गूढवादाचा सर्वात महत्त्वाचा श्रेष्ठ आविष्कार बहुधा भीमाच्याच काव्यात सापडेल.

3.

‘स्तुतिचिंतामणी’ आणि ‘भजनमाला’

‘स्तुतिचिंतामणी’ हे भीमा भोईचे बहुधा सर्वात महत्त्वाचे काव्य आहे. तो शंभर बोलींचा संग्रह आहे. ‘बोली’ हा उडिया भाषेतला तांत्रिक शब्द आहे. त्याचा अर्थ कडवे किंवा सर्ग. त्याला सर्ग म्हणणे भीमाच्या काव्याच्या दृष्टीने योग्य ठरेल. प्रत्येक बोलीमध्ये दोन-दोन ओळींची 20 कडवी आहेत. अशा रीतीने ‘स्तुतिचिंतामणी’ हा 2000 कडव्यांचा किंवा 4000 ओळींचा संग्रह आहे. त्यामध्ये काही आत्मचरित्रात्मक, वैयक्तिक आणि न्यूनभावाची कबुली देणाऱ्या कविता आहेत. शिवाय सामाजिक मूल्यांच्या ऱ्हासाचे वर्णन करणाऱ्या कविताही आहेत. त्याच्या शेवटी अलेख पंथाचे स्तुतिस्तोत्र आहे आणि दु:खी मानवांना अलेख आणि त्याचा ‘महिमा’ यांच्या कृपेसाठी प्रयत्न करण्याचा कळकळीचा उपदेश आहे.

सरलादासपासून भीमा भोईपर्यंत सर्वांनी ‘शून्यनिरंजन’ किंवा ‘अलेख’ म्हणून वर्णन केलेली सर्वोच्च सत्याची संकल्पना ही भक्तिवाङ्मयाचा भाग बनून गेली. यातल्या प्रत्येक शब्दाला भारतीय अध्यात्मामध्ये दीर्घ परंपरा आहे. उपनिषदांमध्ये निरंजनाचे वर्णन ब्रह्माप्रमाणे केलेले आहे. निरंजनाचा शब्दश: अर्थ अज्ञान किंवा अविद्येपासून पूर्णपणे मुक्त असलेला आत्मा असा आहे. ‘स्तुतिचिंतामणी’मध्ये भीमा भोईने विश्वाविषयी मांडलेली कल्पना स्थूलमानाने खालीलप्रमाणे सांगता येईल –

“शांतीचे साकार रूप असलेल्या अनाम, अलेख ब्रह्मामधून शून्य निर्माण झाले. या महाशून्याच्या अस्तित्वातून अवकाश आणि आकाश निर्माण झाले. आकाशातून रंग निर्माण झाले. नंतर अनामातून अग्नी, इथर आणि पाणी तयार झाले. त्यानंतर पुढे अनामातून सूर्य, चंद्र; ब्रह्मा, विष्णू व महेश यांची त्रिमूर्ती आणि सर्व चराचर वस्तूंची निर्मिती झाली.

अशा रीतीने ‘स्तुतिचिंतामणी’मध्ये अलेख विश्वामध्ये आणि धार्मिक उपासनेमध्ये ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांना गौण स्थान दिलेले दिसते. ‘स्तुतिचिंतामणी’मध्ये वेगवेगळ्या ठिकाणी भीमा भोईने असे म्हटलेले आहे की श्रेष्ठ परमेश्वराने स्वत:ला कृष्ण आणि जगन्नाथामध्ये प्रकट केले आहे. महिमा पंथ हा मूलत: उत्कट मानवी करुणेवर आधारित पंथ आहे. मानव प्राण्यांना अपराध आणि पापाच्या कर्दमात लोळताना पाहून भीमाला वाटणारी गाढ व्यथा ‘स्तुतिचिंतामणी’मध्ये प्रकट झालेली दिसते. समाज म्हणजे भीमाला मूर्तिमंत नैतिक अध:पतन

आणि चारित्र्यहीनता वाटते. भीमाला याची कारणे सन्मार्गापासून ढळण्यामध्ये आणि परमेश्वरी कृपेच्या अज्ञानामध्ये दिसतात. भीमा माणसांना विनवणी करतो की त्यांनी महिमा तत्त्वज्ञानामध्ये दाखवलेल्या सन्मार्गाने जावे. त्याने असा इशाराही दिला आहे की लोकांनी जीवनाच्या नवीन मार्गाचा स्वीकार केला नाही. तर योगिनी सगळ्या जगाचा नाश करून टाकतील. भीमाच्या सामाजिक आणि नैतिक तत्त्वज्ञानात भविष्यातील युगाच्या वर्णनाला, कलियुगाच्या अंताला महत्त्वाचे स्थान दिलेले दिसते. नैतिक मूल्यांना आणि करुणेला कलियुगात स्थान नाही. व्यक्ती आत्मघातकी पापाच्या मार्गाने जातात आणि आपल्या बांधवांची पर्वा करीत नाहीत. शरीरसुखाचे मोह बाजूला सारून सत्त्वशील मार्गाने जाण्याची आवश्यकता त्यांना समजत नाही. याचा परिणाम म्हणजे संभ्रम, समाजामधील अनागोंदी, अविद्या आणि व्यक्तींमधील अपराधगंड आणि अश्रद्धा. पण या कलियुगाचा नाश होईल आणि समाज आणि मानवी सृष्टीच्या पुनर्निर्माणाचे कार्य महिमा पंथ आणि त्याच्या तत्त्वांवरील विश्वास यांच्या द्वारे होऊ शकेल.

त्यामुळे महिमा पंथ हा एक प्रकारे मूलतः मानवतावादी पंथ आहे. या पंथाची श्रद्धा आहे की अगदी वाईट अशा पातक्याला सुद्धा परमेश्वर भक्तीच्या मार्गाने मोक्ष मिळू शकतो. खोटे बोलणे, व्यभिचार, मत्सर आणि हाव यांचा पूर्णतया त्याग केला पाहिजे. सुख आणि दुःख समान मानून राहिले पाहिजे. स्त्रीकडे मातृत्वभावाने पाहिले पाहिजे.

भीमा भोईला मानवी उत्थानाची तीव्र तळमळ होती, त्याच्या काळातील नैतिक अधःपात आणि सामाजिक अनागोंदी पाहून तो दुःखी होता हे त्याच्या साहित्यात स्पष्टपणे दिसून येते. 'स्तुतिचिंतामणी'मध्ये तो मानवी दुःखे आणि यातना पहातो आणि त्यांचा आढावा घेतो तेव्हा तर हे अधिकच स्पष्टपणे जाणवते. मानवी दुःखाच्या नियतीला तोंड देण्यासाठी भीमा भोई गाढ मानवी श्रद्धेचे अढळ स्वप्न पाहतो. तो दुःखाच्या भागधेयावर दोन उपाय सांगतो. एक धार्मिक आणि दुसरा काव्यात्म. ही दोन्ही त्याच्या महत्त्वाच्या लिखाणात व्यक्त होतात आणि 'स्तुतिचिंतामणी'मध्ये बिकट आध्यात्मिक प्रश्नांची उकल करण्याची त्याच्यातल्या कवीची धडपड आणि शोध तर दिसतोच पण शिवाय अथांग मानवी भावविश्व अगदी सोप्या, साध्या भाषेत व्यक्त करण्याचे त्याचे सामर्थ्यही दिसून येते. बऱ्याचशा मध्ययुगीन साहित्यात आढळणारी कृत्रिमता आणि कारागिरी भीमा भोईच्या साहित्यात नसल्यामुळे ते हृदयाला हात घालते. तो हाडाचा निःसीम भक्त आहे. दुःखी मानवतेसाठी काहीतरी करण्याची त्याची तळमळ आहे आणि ती व्यक्त करताना त्याच्या व्यथित मनात फुटलेला सहजोद्गार म्हणजे त्याची कविता आहे.

वैष्णव कवींनी प्रार्थना आणि स्तोत्रांचे मूलतः तीन प्रकार वर्णन केले आहेत. हे तीन प्रकार खालीलप्रमाणे सांगता येतील. 1) परमेश्वरासमोर आपली दुःखे आणि दुर्दैव मांडण्याचा प्रधान हेतू असलेली स्तोत्रे.

2) परमेश्वराची सर्वोच्च शक्ती आणि मोक्ष देण्याचे त्याचे सामर्थ्य वर्णन करणारी स्तोत्रे

आणि

3) भक्ताच्या किमान आकांक्षा पूर्ण करण्याची प्रार्थना करणारी स्तोत्रे.

स्तोत्रे आणि प्रार्थनांचे तीनही प्रकार 'स्तुतिचिंतामणी'मध्ये पहायला मिळतात.

विद्वानांनी भीमा भोईची गणना रामकृष्ण आणि सरलादास यासारख्या संतांच्या पंक्तीमध्ये करण्याचा प्रयत्न केला आहे. साहित्यामध्ये किंवा धार्मिक गीतांमध्ये तुलना करणे हे केव्हाही वाईटच आणि ते टाळावे. त्यातून फारसे काही साध्य होत नाही. भीमा भोईच्या जीवनाविषयी आपल्याला इतकी थोडी माहिती आहे की रामकृष्ण किंवा सरलादासांच्या जीवनाशी त्याच्या जीवनाची अर्थपूर्ण तुलना करणे अशक्यच आहे. सरलादास ज्याप्रमाणे आपल्या सर्व सृजनशीलतेचे आणि प्रेरणेचे श्रेय सरलादेवीला देतो त्याप्रमाणे भीमा आपल्या साहित्याचे श्रेय आपल्या बुद्धीला न देता दैवी प्रेरणेला देतो. 'स्तुतिचिंतामणी' या त्याच्या महत्त्वाच्या कृतीचे परिशीलन केले असता सर्व पापांपासून आत्मा मुक्त करण्याच्या आणि खऱ्या धार्मिकतेवर आधारित समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या त्याच्या विलक्षण तळमळीची तीव्रता आपल्याला जाणवते. 'स्तुतिचिंतामणी'च्या विविध बोलींमध्ये कवी अशा आत्मिक अवस्थेचे वर्णन करतो. जिच्यामध्ये ब्रह्माविषयीची आंतरिक भक्ती आणि समर्पणभाव साध्य होईल. त्याच्या जीवनविषयक दृष्टिकोनात संपूर्ण निरासक्ती आणि लहान मुलासारखी कमालीची ओढ आढळून येते. जीवनातील यातना आणि परमानंद व्यक्त करणारे आणि परमेश्वरी कृपेची पहाट वर्णन करणारे त्याचे काव्य हृदय हेलावून टाकते. अंत:करणातील समाधान व्यक्त करताना भीमा पुढील ओळी लिहितो –

"सखोल चिंतन आणि बुद्धीच्या साह्याने माणूस सर्वश्रेष्ठ गुरूचे दर्शन घेऊ शकतो की नाही, ते मला माहीत नाही. पण मी त्याला पहातो आणि त्याला पहाताना त्याला जे सांगायचे ते विसरून जातो."

या ओळीतून अप्रत्यक्षपणे भीमा ज्ञानापेक्षा भक्ती श्रेष्ठ आहे हे सिद्ध करतोच पण शिवाय भक्त अंतिम सत्याचे किंवा अलेख निरंजनाचे दर्शन ज्या आध्यात्मिक आणि भावनिक अवस्थेत घेऊ शकतो त्या अवस्थेचे चित्रण करण्याचा प्रयत्नही करतो. मोक्षाचा शोध व अस्तित्वाच्या उच्च पातळीच्या अवस्थेची प्राप्ती ही दोन्ही रूपे इथे दृढपणे एकमेकांमध्ये गुंफलेली दिसतात. त्याची आपल्या बिकट स्थितीबद्दलची व्यथाही इथे प्रकट होते. त्याच्या लिखाणामधून अशीही जाणीव आढळते की सतत आत्मपरीक्षण आणि आत्मशुद्धीकरण यातून माणसाला ब्रह्मप्राप्तीला योग्य अशी मानसिकता प्राप्त करता येते. आत्मशुद्धीकरणाच्या स्वनियंत्रणाच्या आणि स्वपरित्यागाच्या या शोधामध्ये काही वेळा घोर निराशा आणि क्रोधाचीही अवस्था प्राप्त होते. जेव्हा ध्येय अजूनही खूप दूरवर व अज्ञात राहते, स्वपरित्यागाचे सर्व प्रयत्न होतात आणि अहंकाराची चिवटमुळे तुटता तुटत नाहीत, जेव्हा भोवतालचे जग पश्चाताप आणि पापाच्या खाईमध्ये खोलखोल बुडत चालल्यासारखे वाटते, तेव्हा विकार आणि क्रोध उफाळतात. अशा प्रसंगी भीमा आपल्या आत्म्याविरुद्ध आणि समाजाविरुद्धही आवाज उठवतो.

वैयक्तिक शुद्धीच्या या शोधामध्ये तो मानवतेच्या नव्या जीवनाचे स्वप्न पाहतो आणि सद्य:स्थितीतील ऱ्हासातून तिचे उत्थान करण्याची ज्वलंत आकांक्षा व्यक्त करतो. या उद्दिष्टासाठी स्वत:च्या आत्म्यासह कुठल्याही गोष्टीचा त्याग करण्याची त्याची तयारी आहे.

'स्तुतिचिंतामणी'च्या प्रस्तावनेमध्ये कै. प्रा. आर्तबल्लब महन्तींनी तर भीमा भोईची तुलना येशू ख्रिस्ताशी केली आहे. त्यांचे मत असे बनते की येशू ख्रिस्ताने ज्याप्रमाणे दु:खी मानवतेसाठी क्रुसावरच्या यातना सहन केल्या, त्याचप्रमाणे भीमा भोईचा आत्माही सतत क्रुसावर होता आणि स्वत:ला आणि संपूर्ण मानवतेला अधिक पवित्र आणि अधिक चांगले जीवन लाभावे म्हणून शोध करणाऱ्या अस्वस्थ आत्म्याच्या वेदना आणि व्यथा सोसत होता. भीमाच्या खालील ओळी येशूच्या क्रुसावरच्या शब्दांची आठवण देतात – ''माझ्या परमेश्वरा, तू मला का सहाय्य करीत नाहीस? तुझ्या यशाचे गान करताना माझी स्वत:ची प्रतिष्ठा धुळीला मिळाली. मी तुझे अज्ञात म्हणून वर्णन करीत असताना त्यांनी मला ख्रिश्चन म्हणून हिणवले. आणि मला असंख्य यातना दिल्या. मी सत्यधर्माविषयी बोलत असताना ते स्वत: पापी असूनही माझा धिक्कार करतात. ते आरोळ्या ठोकतात'', त्याला हाकलून काढा, हाकून द्या. बघू त्याचा देव त्याचे कसे रक्षण करतो ते! तो पापी आहे, त्याला अन्न किंवा आसरा देऊ नका.'' आणि जेव्हा मी समानतेविषयी बोलायला लागतो तेव्हा उत्तरादाखल ते मला कुत्र्याप्रमाणे वागवतात. भगवंता, जिथे जावे तिथे माझी ही गती आहे. मला वाटतं की यापुढं कुठं जाणं येणं नको. या अशा जुलमी परिस्थितीत मी कुठं जाऊ?''
(इंग्रजी अनुवाद - मायाधर मानसिंह)

मानवी जीवनावरच्या सामाजिक व आध्यात्मिक अशा दोन्ही जुलमांची भीमाला चांगली जाणीव होती. पहिला जुलूम माणसांचा माणसांच्या विरुद्ध, एका गटाचा दुसऱ्या गटाविरुद्ध होता. त्याच्या स्वत:च्या जीवनात प्रवास करताना, एकेश्वरवादावर प्रवचन करताना आणि मूर्तिपूजेवर हल्ला चढवताना त्याला अपमान, मानभंग आणि शत्रुत्व यांचा सामना करावा लागला होता. प्रचलित सामाजिक आणि नैतिक मूल्यांच्या विरोधात त्याने सर्वार्थाने बंडखोरी केली. आपल्या एका भजनात त्याने हिंदू मूर्तिपूजेवर टीका केली आहे – ''लोक मूर्तीची पूजा करतात. लाडू, पोळ्या आणि मिठायांचे नैवेद्य दाखवतात. आणि रक्षणासाठी प्रार्थना करतात, हा शुद्ध अडाणीपणा आहे. त्यांना एवढी साधी गोष्ट समजत नाही की या नुसत्या आत्मा नसलेल्या आकृत्या आहेत. त्या आकृत्या या लोकांच्या इच्छा कशा पूर्ण करतील? ज्याने यांना निर्माण केले त्या परमेश्वराची पूजा हे करीत नाहीत आणि लाकडाच्या आणि धातूच्या मूर्तींच्या कच्छपी लागतात आणि 'आम्हाला वाचवा, आम्हाला वाचवा', म्हणून विनवण्या करतात! निर्जीव मूर्तींच्याकडे पहाण्याचा सजीव मानवांचा किती हा अविचारी दृष्टिकोन आहे! आणि हेही किती विचित्र की ज्या परमेश्वराने मानवीसृष्टी शून्यातून निर्माण केली त्याला हे सर्वजण पार विसरून गेले आहेत!''
(इंग्रजी अनुवाद - मायाधर मानसिंह)

डॉ. मायाधर मानसिंहांनी भीमाची तुलना प्रारंभीच्या काळातील ख्रिश्चन धर्मप्रचारकाशी केली आहे. सामाजिक जुलूम नसलेले आणि समतावादी, न्यायी आणि 'धर्मप्रवण' समाजव्यवस्था असलेले रामराज्य भविष्यात निर्माण होईल, यावर त्याची कितीही दृढ श्रद्धा असली तरी हेही खरेच की तो काही वेळा निराशा आणि तीव्र मानसिक वेदनांनी विव्हळ होतो. मात्र त्यामुळे हे सर्व एके दिवशी नष्ट होणार आहे यावरचा त्याचा विश्वास ढळत नाही. समाजात पसरणाऱ्या असंस्कारित प्रणालीवर हल्ला चढविताना एका भजनामध्ये तो म्हणतो, "हे जुलूम नष्ट होतील. या हुकूमशहांचा अहंकार तो प्रभू उद्ध्वस्त करील तो दिवस लांब नाही. तो इतक्या कौशल्याने हे साध्य करील की एकापाठोपाठ एक पापी लोक कसे नष्ट झाले हे इतरांना कळणार सुद्धा नाही. हे पापी अशा काही पापांच्या आणि अनैतिकतेच्या गर्तेत बुडलेले आहेत आणि मायाजाळात फसलेले आहेत की कुठलाही धर्म कोणत्याही रीतीने त्यांना वाचवू शकणार नाही. त्यांच्यापैकी काही पापी आगीत जळून मरतील, काही पाण्यात बुडून जातील आणि काही नुसते खाली पडून मरतील. काही जणांचा सर्पदंशाने अंत होईल. आणि काही जणांच्या मानेभोवती गळफास बसेल. आणखी काही जणांना अज्ञात रोगांच्या यातना आणि अर्धांगवायूचा कंप सहन करावा लागेल आणि त्यातून जे वाचतील त्यांची शक्ती संपलेली असेल."
(इंग्रजी अनुवाद - मायाधर मानसिंह)

भारतीय संदर्भात पाप हे मूलतः दोन प्रकारचे मानलेले आहे. पूर्वसंचित आणि वर्तमानात उद्भवलेले पहिले पाप हा माणसाच्या पूर्वजन्मातल्या कृत्यांचा परिणाम असतो आणि त्यामुळे त्याचा आत्मा या पापापासून पळून जाऊ शकत नाही किंवा त्याचे नियंत्रण करू शकत नाही. दुसरे पाप हा माणसाच्या या जन्मातल्या कृत्यांचा परिपाक असतो. त्यामुळे दुसरे पाप टाळण्यासाठी माणूस स्वयंशिस्तीवर आधारित भक्तिमार्गाचा अवलंब करू शकतो. पण पहिले पाप नष्ट होण्यासाठी मात्र परमेश्वराची कृपाच हवी. म्हणूनच भक्तीच्या मन शुद्ध करण्याच्या शक्तीची जाणीव असूनही भीमाने निःस्वार्थी, समर्पणशील कर्मावर भर दिला आहे. निःस्वार्थी भक्तिमय कर्माच्या कल्पनेबरोबरच त्याच्या शरणागती आणि अंतिम त्याग या दोन कल्पनाही येतात. हा असा कवी आहे की जो जगाच्या उद्धाराला मदत होणार असेल आणि मानवजातीचे दुःख हलके होणार असेल तर नरकात जायला तयार आहे. शिवाय त्याने सुख आणि दुःख अपराध आणि पाप, प्रत्येक गोष्ट परमेश्वराच्या चरणाशी अर्पण करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला आहे.

"सुख आणि दुःख, पारतंत्र्य आणि स्वातंत्र्य या सर्व गोष्टी तूच निर्माण केल्या आहेस. तुझीच निर्मिती असलेले हे पापाचे अवजड ओझे सहजपणे कोण वाहू शकेल? तेव्हा हे ओझे मला तुझ्याच पायाशी टाकू दे. तूच याचा अंतिम निवाडा कर. या समस्येचे उत्तर तुझ्याशिवाय कोण देऊ शकेल? मला आशा आहे की माझी पापे एका तबकात एकत्र करून मी ती तुझ्या पायाशी ठेवीन. तुझे भक्त तुझी प्रार्थना करीत आणि अश्रू ढाळत जन्म

घालवतात. तू लोकांना त्यांच्या पापांसाठी क्षमा का करीत नाहीस आणि जगाचा व्यवहार न्यायाने का चालवत नाहीस? संवेदनशील लोकांच्या दु:खात व यातनातही त्यांच्याविषयी कठोरपणा धारण करणारा निष्ठुर मनाचा तुझ्यासारख्या कोण असेल? जगाच्या उद्धारासाठी आवश्यक असेल तर मी कायम नरकात राहायलाही तयार आहे.''

भीमाला या भावनेमुळे तीव्र दु:ख होत असे की कलियुगाच्या महिम्यामुळे गुन्हे आणि पाप वाढत आहे. आणि सर्व जग घोर अंधारात आणि नरकात रूतत चालले आहे.

''या जगातील लोक पाप कर्मे आणि दुर्वर्तन यामुळे रसातळाला जातील. जेव्हा मी या नवखंड पृथ्वीचा विचार करतो तेव्हा ती मला एखाद्या ताटलीसारखी वाटते. आणि छप्पन्न कोटी माणसं माझ्या मनश्चक्षूंसमोर गवताच्या पात्याप्रमाणे तरळतात. एका दिवसात, एका क्षणात मी हे जग उलटवून देऊ शकतो. पण मी नुसता दात ओठ खात मुकाटपणे बसतो कारण मला परमेश्वराच्या दिव्य प्रेरणेची तशी आज्ञा नाही.''

यापुढे मानवांच्या मुक्तीसाठी त्याने ईश्वराला करुण प्रार्थना केली आहे.

तुझे सारे भक्त करुण आवाजात तुला साद देत धुळीत लोटांगण घालत आहेत. आमच्या पापांची, आमच्या गुन्ह्यांची क्षमा कर आणि परमेश्वरा, या जगाला मुक्ती दे.''

युगाची कल्पना भीमा भोईच्या विचाराचा एक अविभाज्य भाग आहे. या कल्पनेनुसार सत्ययुगापासून कलियुगापर्यंत समाजातील मूल्यांचा क्रमाने ऱ्हास होत आला आहे. 'स्तुतिचिंतामणी'च्या 24, 25 आणि 26 या सर्गात भीमा या ऱ्हासाचे तपशीलवार वर्णन करतो. पापाच्या वर्चस्वामुळे काय घडणं शक्य आहे याचे भयंकर चित्र तो रेखाटतो. दिवसा कसा अंधार होईल, समुद्राला भरती येऊन सगळे जग कसे बुडून जाईल, आकाशातून तारे कसे खाली पडतील याचे तो वर्णन करतो. माणसे अधाशीपणा, विश्वासघात, खोटेपणा, फसवणूक आणि अप्रमाणिकपणा यासारख्या क्षुद्र विकारांनी कशी ग्रासलेली आहेत याबद्दल तो बोलतो. या संकुचित वृत्तीच्या सततच्या संकटांविरुद्ध लढण्यासाठी भीमा अलेखाच्या कृपेची प्रार्थना करतो. आणि मानवांना सन्मार्गाकडे वळण्याची हाक देतो. त्याला वाटते की कलियुगाचा शेवट जवळ आला आहे. 'स्तुतिचिंतामणी'च्या शेवटच्या सर्गात (100 व्या बोलीमध्ये) तो याचा उल्लेख करतो आणि सर्वांना भगवान अलेखाची प्रार्थना करण्याचा आणि महिमाचे नामस्मरण करण्याचा उपदेश करतो. शब्दश: महिमा म्हणजे शक्ती किंवा वैभव, भीमा भोईने ज्या पद्धतीने तो शब्द वापरला आहे त्या पद्धतीने तो परमेश्वराची सत्ता आणि वैभव, अलेख निरंजन, अलिखित, विशुद्ध, सर्वश्रेष्ठ सत्य असाच आहे. भीमा रूद्रांना, ब्रह्मलोकातील माणसांना, देवतांना, नागांना, असुरांना, खरे म्हणजे सर्व सजीवांना सर्वश्रेष्ठ सत्याचे स्मरण करण्याचा, त्याची कृपा आणि करुणा भाकण्याचा उपदेश करतो. त्याचबरोबर तो सन्मार्गाच्या आणि आत्मशुद्धीकरणाच्या आवश्यकतेवरही भर देतो.

'स्तुतिचिंतामणी'च्या बोली, भजनाप्रमाणे गाता येतात. टाळ आणि तंबोऱ्याच्या साथीने या भजनांचे सौंदर्य आणि मोहिनी वाढते. 'स्तुतिचिंतामणी'च्या बोली आणि तीनशेहून अधिक

भजने उडिया धार्मिक साहित्याच्या सर्वश्रेष्ठ रचनांमध्ये मोडतात. ही भजने अनघड, उत्स्फूर्त आणि साध्या भाषेत आणि साध्या रचनेची आहेत. आणि तरीही त्यांच्यामध्ये उत्कट भावना आणि पावित्र्याचे स्मरण आहे. काही वेळा त्यामध्ये उत्कृष्ट प्रतिमा आढळतात. या पुस्तकामध्ये मूळच्या संहिता रोमन लिपीत देऊन सात भजने समाविष्ट केली आहेत त्यातून या प्रतिभाशाली कवीचे आश्चर्यकारक प्रतिमा आणि रूपके निर्माण करण्याचे सामर्थ्य दिसून येते. काही वेळा परस्परविरोधी दृश्ये, संकल्पना आणि परिस्थिती यांच्या चित्रणातून तो विलक्षण व उत्कट काव्यक्षेत्र निर्माण करतो. या काव्यक्षेत्रात अनोखी फुले फुलतात आणि धुळीत मिळून जातात, आत्म्यांच्या विलक्षण मधमाशा जाणीवेच्या मधुरसाचा शोध घेत असतात, ग्रहांचे शांत मूकसंगीत चालू असते, असा वसंत ऋतू असतो की जेथे झाडे बहरतात पण त्यांना सावली नसते, चार रंगांची फुले आहेत पण त्यांच्यामध्ये फक्त विष आहे. इथे परमेश्वराला अवयव नाहीत पण तो हालचाल करतो, तो मातपित्यांवाचून जन्माला आलेला आहे, मातृस्तन्य न घेताही तो त्यावरच वाढलेला आहे. या काव्यक्षेत्रातील नद्यांना पूर येतात, उल्का निखळून पृथ्वीवर पडतात, इथे समुद्र जलहीन आहे, इथली जमीन स्थिर असूनही अनामिक पावलांच्या चाहूलीने थरारते, या प्रदेशात प्रत्येक जण राजासारखा सजलेला आहे. पण कोणीच वस्त्र परिधान केलेले नाही, नृत्य चालू आहे पण त्याचे संगीत ऐकू येत नाही. एका भजनाच्या शब्दात सांगायचे तर भीमा भोई निरागस बोलांच्या अशा अवस्थेला पोचलेला आहे की जेथे रूपके अनावश्यक आहेत आणि काव्यकलेला स्थान नाही. यावेळी आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की हे सर्व लिहिणारा आंधळा कवी अनागर, अर्धवस्त्र आणि आदिम कोंढ जमातीचा आहे आणि त्याने पश्चिम आणि दक्षिण ओरिसाच्या दुर्गम टेकड्या आणि जंगलांच्या बाहेर कधी पाऊल टाकलेले नाही. मानसिंहांनी त्याला अलेख पंथाचा राजकवी म्हटले आहे. ते अत्यंत सार्थ आहे. खरोखर महिमा किंवा अलेख पंथाचा गर्भितार्थ वर्णन करणाऱ्या त्याच्या उत्कट गीतांनीच या पंथाला लक्षावधी अनुयायी मिळाले. पण भीमामध्ये धार्मिक पंथ कवीपेक्षा अधिक काही तरी आहे. तो श्रेष्ठ गीतकार आहे आणि त्याच्या संगीताच्या जाणिवेला तोड नाही. त्याच्या भजनांच्या ध्वनिमुद्रिका निघाल्या आहेत. आणि आधुनिक उडिया संगीतातील काही सर्वश्रेष्ठ गायकांनी त्या गायिलेल्या आहेत.

साहित्य अकादेमीने चौदा भारतीय भाषांपैकी प्रत्येक भाषेतील साहित्याच्या प्राणतत्त्वाचा आविष्कार करणाऱ्या काही ओळी मागवल्या, तेव्हा उडिया साहित्यिकांनी भीमाच्या 'स्तुतिचिंतामणी'च्या सत्ताविसाव्या बोलीतल्या या दोन हृदयस्पर्शी ओळी निवडल्या, ''माझा आत्मा नरकात पिचत राहिला तरी चालेल पण या विश्वाचा उद्धार होऊ दे.''

'स्तुतिचिंतामणी'च्या 15व्या, 20व्या, 27व्या आणि 75व्या बोलीतील चार उतारे मूळ रोमन लिपीत आणि त्यांचे नागर भाषांतरही दिले आहे. मूळ उताऱ्यांमध्ये भीमाचे लोकभाषेवरील प्रभुत्व, कुशल वाक्यप्रयोग आणि बोलीभाषेचा समर्थ उपयोग प्रकट होतो. उडिया साहित्यात भीमाच्या काव्यात प्रथमच धार्मिक कवितेला उत्कट भावना आणि बोली

भाषेतील वाक्यप्रयोग लाभले. मध्ययुगीन भजनात आणि भक्तकवी मधुसूदनाच्या काव्यात भावनांची तीव्रता तुलनेने अधिक संस्कारित भाषेत प्रकट होते. या तुलनेत भीमाची भाषा धर्माशी नाते सांगणारी आहे आणि कवीच्या उत्कट भावनांची कंपने प्रकट करणारी आहे. या भावनांमध्ये आर्तप्रार्थनांपासून सात्त्विक संतापापर्यंत आणि लीन शरणागतीपासून आवेशयुक्त नैतिक उद्घोषापर्यंत विलक्षण वैविध्य आहे.

'स्तुतिचिंतामणी' आणि 'भजनमाला' वाचून भीमा भोईच्या कवित्वाच्या श्रेष्ठ दर्जाची कल्पना येते. भावनांच्या तीव्रतेनुसार भाषेला वाकवण्याचे त्याचे सामर्थ्य आश्चर्यकारक आहे. आणि वाङ्मयप्रकार, शैली किंवा भाषिक आकृतिबंध यांची बंधने त्याला कुठेच अडवत नाहीत. ही कवीची, प्रगल्भ कवीची लक्षणे आहेत आणि भीमा हा प्रगल्भकवी होता.

4.

इतर साहित्यकृती

'ब्रह्म निरूपण गीते' या संग्रहात भीमाने ब्रह्माचे स्वरूप आणि गुणधर्म वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे. विशेषत: चौथ्या सर्गामध्ये हा प्रयत्न आढळतो. हे वर्णन परिस्थिती, गुणधर्म आणि वस्तूंमधून निर्माण होणाऱ्या विरोधाभासांच्या जोड्यांच्या मालिकांमधनू केलेले आहे. काही विरोधाभास असे आहेत,

"तो शिष्य आहे आणि तो गुरू आहे. तो अंधार आहे आणि प्रकाशही आहे. तो शिक्षा देतो आणि तोच शिक्षा भोगतो. तो कैदी आहे आणि बंदीपाल ही तोच आहे. तो कर्म आहे, तो भ्रम आहे आणि तरीही तो मृत्युदेव यम आणि काल अशा दोन्ही भूमिकांतून शिक्षा देतो. तो बोलतो, तरीही मो मूक असतो. तो निराकार असूनही त्याला आकार आहे. तो अनोखा कलावंत आहे आणि सर्व कलावस्तूंतही तोच आहे. सर्वसंग त्याग करून देवत्वाला पोचलेला योगीही तोच आणि विलास करणारा भोगीही तोच आहे."

भीमा भोईला जाणीव होती की वेद आणि वेदान्तांना सुद्धा ब्रह्माची, सर्व अशाश्वत दृश्यवस्तूंच्या तळाशी वसणाऱ्या अपरिहार्य व अपरिवर्तनीय सत्याची, व्याख्या करणे जमलेले नाही. वस्तुत: आपल्या लेखनात तो हे अनेक वेळा सांगतो. त्याला ही जाणीव आहे की शास्त्रं किंवा बुद्धिवादी पुरुषाचे विद्वत्तापूर्ण वादविवाद हा काही परमेश्वराचे स्वरूप जाणण्याचा मार्ग नाही. त्यातून माणूस संशय आणि अनिश्चिततेच्या जाळ्यात अधिकाधिक सापडतो. ज्ञानाचे प्रदर्शन मांडणाऱ्या पंडितांना ब्रह्माचे ज्ञान होत नाही कारण ते ब्रह्म बुद्धी, तर्कशास्त्र आणि ज्ञानाच्या पलिकडचे आहे. लहान मूल ज्या आर्ततेने आईसाठी तळमळते तशी आर्त तळमळ हाच ब्रह्माच्या प्राप्तीचा मार्ग आहे. ब्रह्म कृपामय, दयामय आहे आणि आपण आपला अहंकार नष्ट करून अंत:करणपूर्वक त्याच्या आशीर्वादासाठी आणि कृपेसाठी तळमळत असू तरच तो आपल्या पापांची क्षमा करील. या संदर्भात भीमा भोईचे रामकृष्ण परमहंसांशी थोडे साम्य आहे. रामकृष्णांप्रमाणे भीमा भोई गूढवादी नव्हता आणि समाधीमध्ये जात नसे. पण आत्मा परमेश्वरासाठी व्याकूळ होऊन तळमळत असेल तर त्यातून व्यक्तीचे जीवन विशुद्ध होते. यावर त्याचा विश्वास होता.

'ब्रह्मनिरूपणा'मध्ये त्याने वेद, पुराणे आणि इतर पारंपारिक ग्रंथांमधल्या पढीक ज्ञानाला

फारसे महत्त्व दिलेले नाही. याउलट तो म्हणतो की यांपैकी कोणत्याही पवित्र ग्रंथात परमेश्वराचे स्वरूप आणि स्वभाव यांविषयीचे ज्ञान नाही. तो पुढे असे सांगतो की तेहतीस कोटी देवता, असंख्य योगिनी, ऋषी, गंधर्व आणि किन्नर यांना त्याची शक्ती आणि आविष्कार समजलेले नाहीत. ग्रह ताऱ्यांनीही परमेश्वर समजलेला नाही. ऋतूंच्या चक्रात आणि चार धर्मात त्याच्या अस्तित्वाचे गूढ सामावले जात नाही. इतर ठिकाणी भीमा भोईने सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या वीणेच्या आवाजाचा संदर्भ दिला आहे. या वीणेचा ध्वनिहीन ध्वनी केवळ ध्यानयोगातूनच ऐकता येतो. या मार्गाने चिरंतन वसंत ऋतू असलेल्या आणि आत्म्याची तहानभूक हरपून टाकणाऱ्या महाशून्याकडे जाता येते. भीमाच्या मनात सतत या मार्गाचा विचार असे आणि अंतिम सत्याचे खरे दर्शन असा तो मार्ग त्याला साध्य करायचा होता.

'अस्त्क बिहारी गीता'मध्ये भीमाने सर्व मानवांना, आणि विशेषत: भक्तांना, पवित्र तापसी जीवन जगण्याचा आणि आपले अंत:करण पूर्णपणे परमेश्वराच्या आज्ञांप्रमाणे व्यतीत करण्याचा उपदेश केला आहे. कलियुगामध्ये उदंड माजलेल्या पापांच्या आणि अन्यायांच्या जाणिवेने तो व्यथित झालेला दिसतो. समाजाचा अध:पात आणि मूल्यांचा ऱ्हास पाहून भीमाला यातना होतात. समाजाला नवजीवन आणि व्यक्तीला मोक्ष मिळावा म्हणून हा ऱ्हास थांबवण्यासाठी जी कर्मे करायला हवी त्या कर्मांची मालिका 'अस्त्क बिहारी गीता'मध्ये पहायला मिळते. अहंकार आणि त्याच्यापाठोपाठ येणारे ढोंग यांचा त्याग करून सत्य महिमा धर्माचा म्हणजे परमेश्वरी मार्गाचा अवलंब करण्याचा आणि अलेख आणि महिमामध्ये मोक्ष शोधण्याचा उपदेश भीमाने केला आहे. 'अस्त्क बिहारी गीता'मध्ये ज्ञान आणि भक्तियोगाचे वर्णन सोप्या भाषेत केले आहे. प्रत्येक जीवनामधल्या, प्रत्येक निर्मिती मधल्या ब्रह्माच्या वैश्विक अस्तित्वाच्या कल्पनेचे भीमाने सुंदर वर्णन केले आहे. आणि सुचवले आहे की पूर्ण समर्पण आणि शरणागती या मार्गानेच मोक्ष सहज मिळवता येतो. त्याच्या शब्दात– ''घाटाजवळ नावाडी आहे. तो नदी ओलांडून देतो. तो तुमच्या आत्म्याला पार करील. हे शरीर घनदाट अरण्यासारखे आहे. परमेश्वराचे स्मरण करा. तो तुमच्या मध्ये, तुमच्या शरीर अस्तित्वाच्या कणाकणामध्ये भरलेला आहे.''

महिमा धर्म आणि त्याच्या तत्त्वांचा 'निर्वेद साधना' हा महत्त्वाचा भाग आहे. पण त्यातील काव्य फार उच्च दर्जाचे नाही. सत्यमहिमा धर्माचे संस्थापक प्रबुद्ध गुरू महिमा स्वामी आणि गोविंद बाबा यांच्यातील संवादामधून काव्य पुढे जाते. या संवादातून सत्यमहिमा धर्माची मूलतत्त्वे स्पष्ट केली आहेत. महिमा स्वामींनी गोविंदबाबांना सत्यमहिमाच्या धार्मिक मार्गाची महत्त्वपूर्ण तत्त्वे सांगून त्यांच्या शंका आणि अडचणींचे निवारण केले आहे. सत्यमहिमा धर्माचे प्रमुख तत्त्व निवृत्ती किंवा वैराग्य किंवा निष्कामता आहे आणि प्रवृत्ती नव्हे, या कल्पनेवर भर दिलेला आहे. चंदनाचे छाप, फुले, टिळे किंवा जानवे ही बाह्य चिन्हे महत्त्वाची नाहीत. साधे व पवित्र जीवन, भिक्षा नागूनही चालेल पण, जे मिळेल ते स्वीकारून जगणे हेच केवळ महत्त्वाचे आहे. वेदांमध्ये सांगितलेले आचार मानवी जीवन आणि मुक्तीच्या शोधासाठी

फारसे उपयुक्त नाहीत. अंतरंगामध्ये जर निर्वेद साधना म्हणजे वेदांवर अवलंबून नसलेली श्रेष्ठ भक्ती आणि तापसी कर्म चालू असेल, तर ब्रह्मप्राप्ती होऊ शकेल. या संवादांमध्ये एकारव्यारा, शून्य, ओंकार, अजपामंत्र वगैरे सत्यमहिमा धर्माच्या काही तांत्रिक संकल्पनांची सुद्धा चर्चा केलेली आहे.

एका मर्यादेपर्यंत 'श्रुतिनिषेध गीता' ही निर्वेद साधनेच्या पातळीची आणि त्याच पद्धतीची आहे. गोविंदबाबांच्या प्रश्नांना उत्तर देताना सत्यमहिमा धर्माने नेमून दिलेल्या कर्मांचे अनादी ब्राह्मणाने स्पष्टीकरण केले आहे. या कृतीमध्ये अनादी ब्राह्मण हा ब्रह्म, परात्पर गुरू किंवा सत्यमहिमा धर्माचा या जगात प्रकट झालेला संस्थापक मानलेला आहे. केवळ ब्रह्मा, विष्णू, महेश ही त्रिमूर्तीच नव्हे, तर तेहतीस कोटी देवता ही महिमा धर्माने का विचारात घेतल्या नाहीत याचे स्पष्टीकरण तो गोविंदबाबांना देतो. आठ लाख योगिनी, नऊ कोटी कांतनी, तारे, ग्रह, निर्माल्यासारख्या पवित्र वस्तू तुळशी औपचारिक पूजा या सर्व गोष्टींकडे का दुर्लक्ष केले आहे, हे ही तो स्पष्ट करतो. भगवान अलेखाच्या पायाशी संपूर्ण शरणागती हीच एक गोष्ट प्रस्थापित करण्याचा त्याने प्रयत्न केला आहे. केवळ त्यातूनच संपूर्ण जीवाला मुक्ती मिळू शकते. अशा मुक्तीसाठी देवतांचा किंवा कर्मकाडांचा काही उपयोग होत नाही.

'कौतिसा मधुचक्र' ही भीमा भोईची दुसरी महत्त्वाची कृती आहे. कौतिसा हा उडिया साहित्यातला प्रसिद्ध काव्यप्रकार आहे. भीमा भोईने उडिया भाषेचे सामर्थ्य पणाला लावून या काव्यप्रकारात प्रयोग केले आहेत. नेहमीच्या कौतिसा प्रकारात कडव्यांची रचना अशी असते की सर्व ओळीतील पहिली अक्षरे उडिया भाषेतल्या मुळाक्षरांच्या क्रमाने येतात. भीमाने अक्षरांच्या अशा क्रमाने तर कौतिसा रचल्या आहेतच, शिवाय उलट्या क्रमानेही रचल्या आहेत. त्याने असाही प्रयत्न केला आहे की प्रत्येक ओळीस असे अनेक शब्द यावेत की त्यांचे पहिले अक्षर हे पहिल्या शब्दाचे पहिले अक्षर असेल. या कौतिसा साधारणत: साध्या आणि सोप्या भाषेत रचलेल्या आहेत आणि बहुधा नवाक्षरी छंदात आहेत. त्यामध्ये महिमा धर्माच्या संकल्पना, कलियुगाचा अंत आणि व्यक्तिगत मोक्षासाठी आणि सामाजिक नवनिर्माणासाठी परमेश्वरी कृपेची आवश्यकता यांचे स्पष्टीकरण केलेले आहे.

'आदि-अंत गीता' हा तांत्रिक ग्रंथच म्हणावा लागेल. त्यामध्ये शरीराची रहस्ये आध्यात्मिक भाषेत स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. जीव म्हणजे स्त्री आणि परम म्हणजे दैवी पुरुष असे कल्पून सविस्तर प्रतीकांच्या साहाय्याने शरीरातील महत्त्वाच्या गोष्टी, त्यातील दहा द्वारे, दहा अवतार, सात द्वीपे, नऊ रत्ने, आणि दहा सिद्धी यांचे वर्णन केले आहे. पतिव्रतेचे महत्त्वाचे गुण सांगून पुरुष आणि स्त्री यांचे शारीरिक मिलन आध्यात्मिक भाषेत वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे. शारीरिक मीलनाचे मर्म आणि पुरुष व स्त्री यांचे नाते आणि जीवाचे परमेश्वराला समर्पित होऊन अंतिम मुक्तीचा शोध घेणे या दोन्हीची तुलना करून या दोन्ही गोष्टी समान असल्याचे दाखवण्याचा प्रयत्न भीमाने केला आहे.

●

5.

एक परीक्षण

फार पूर्वी 1923 मध्ये बी.सी. मुझुमदारांनी भीमा भोईच्या काव्याबद्दल पुढील उद्गार काढले आहेत, ''भीमाच्या तत्त्वज्ञानविषयक थोड्याच कविता मी निवडल्या आहेत पण वाचकांना जाणवेल की भीमाने शाळेत शिक्षण घेतलेले नसले तरी त्याची भाषा चांगली आहे आणि शैली डौलदार आहे. संग्रहातील पहिली कविता उलट्या पद्धतीची कौतिसा आहे. कौतिसाच्या या नव्या प्रकारातून छोट्या गोष्टीत सुद्धा भीमाची मौलिकता जाणवते. ती जरी गूढवादी तात्त्विक कविता असली तरी तिचा गोडवा आणि शैली मनोज्ञ आहे, 'भीमाच्या सर्व कृती अजून हस्तलिखिताच्या स्वरूपात आहेत हे दुर्दैव आहे.' (अधोरेखन माझे आहे) आणि देशाला अभिमान वाटावा अशा या कृतीचे रसग्रहण अजून झालेले नाही. त्याची प्रतिभा उच्च दर्जाची आहे आणि नैतिक धैर्य आणि सुस्पष्ट विचार या गुणांच्या बाबतीत भीमा भोईला ओरिसामधले एक असाधारण व्यक्तित्व म्हणायला हवे, असे माझे नम्र मत आहे.''

तत्कालीन उडीया कवितेच्या संदर्भात भीमाची श्रेष्ठ कवींमध्ये गणना करून ते म्हणतात, ''मी पूर्वीच म्हटले आहे की प्रातिनिधिक संग्रहाच्या दुसऱ्या विभागाच्या शेवटच्या भागात आधुनिक काळातल्या अशा कवींच्या कविता आहेत, ज्यांच्या कवितेत काहीही आधुनिक नाही आणि शैली, शब्दयोजना, वृत्त आणि काव्यविषय याबाबतीत त्यांनी उपेंद्र भांजा आणि अभिमन्यू सामंत यांचे अनुकरण केले आहे. मात्र हा शेरा भीमा भोईला पूर्णपणे लागू होत नाही कारण या उत्कट व प्रामाणिक धर्मशील कवीने उच्च विचारांनी आणि श्रेष्ठ नैतिक कल्पनांनी प्रेरित होऊन साध्या भाषेत कविता लिहिल्या आहेत, पण त्याची शैली सर्वस्वी अगदी आरंभीच्या कवींसारखी आहे आणि त्याच्यावर आधुनिक संस्कृतीचा अप्रत्यक्षसुद्धा परिणाम नसल्याने मी त्याला या गटात टाकले आहे. व्यक्तिश: मी संत भीमा भोईचा मोठा चाहता आहे आणि मला त्याचे जीवन आणि साहित्य अतिशय बोधप्रद आणि विचारार्ह वाटते.''

भीमा भोईने आपल्या हयातीत आपले साहित्य छापण्याचा विचार केला नाही किंवा ते जपून ठेवण्याचीही तसदी घेतली नाही. त्याच्या भजनांच्या आणि गीतांच्या रचनेचा प्रधान

हेतू साध्या व उत्कट काव्यातून महिमा धर्माच्या तत्त्वांचा प्रसार करणे हा होता. महिमा पंथाचा तो गृहस्थ-भक्त होता पण तो तापसाप्रमाणे जगला आणि मुळात तो द्रष्टा होता. त्यामुळे आपले लेखन जपून ठेवून प्रकाशित करण्यात त्याने रस घेतला नाही हे साहजिक होते. त्याच्या जीवनकाळात त्याचे कोणतेच हस्तलिखित प्रकाशित झाले नाही. हळूहळू शेवटच्या काही दशकात महिमा धर्माच्या अनुयायांनी आणि विशेषत: ज्यांना त्याच्या जनाना आणि भजनांमध्ये श्रेष्ठ काव्यगुण आढळले, त्यांनी ती हस्तलिखिते एकत्र करून प्रकाशित केली. कै. प्रा. आर्तबल्लव महन्ती यांनी स्थापन केलेल्या प्राची समितीने 'स्तुतिचिंतामणी' (1931) आणि 'कौतिसा मधुचक्र' (1948) या भीमाच्या दोन सर्वात महत्त्वाच्या कृती प्रकाशित केल्या. त्यांनी 'ब्रह्मनिरूपणगीता' आणि 'भजनमाला' सुद्धा प्रकाशित केली. या प्रत्येक पुस्तकाला प्राचीन आणि मध्ययुगीन उडीया साहित्य आणि तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक प्रा. महन्ती यांची विद्वतापूर्ण प्रस्तावना आहे. कटकच्या 'धर्म ग्रंथ स्टोअर'चे प्रकाशक स्वत: महिमा पंथाचे भक्त होते आणि त्यांनी 1955 ते 1960 या काळात भीमाच्या रचना एकापाठोपाठ एक प्रकाशित केल्या. नंतर 1972 मध्ये त्यांनी भीमा भोईची अधिकृत ग्रंथावली (समग्र वाङ्मय) जवळजवळ अकराशे पानांच्या एका खंडात प्रकाशित केली. महिमा पंथाचे आणखी एक भक्त आणि त्या क्षेत्रातील विद्वान श्री. करुणाकर साहू यांची विस्तृत प्रस्तावना या खंडास मिळाली आहे. 1971 मध्ये कटकच्या दुसऱ्या प्रकाशकांनी 900 पृष्ठांची 'भीमा भोई ग्रंथावली' विस्तृत प्रस्तावनेसह प्रकाशित केली. पूर्वीच्या ग्रंथावलीत भीमा भोईची आठ संपूर्ण पुस्तके आहेत. त्यामध्ये भीमा भोईची आठ बंगाली भजने सुद्धा आहेत. भीमाच्या अनुयायांपैकी काही ओरिसामधील बंगाली होते आणि कदाचित त्यांच्या मदतीने किंवा त्याने स्वत: ही बंगाली कवने रचली असावीत. भीमा भोईच्या साहित्याचे विषय आणि त्याच्या साहित्याची मुख्य पार्श्वभूमी असलेल्या महिमा पंथाचे जाणकार विद्वान असे मानतात की 1971च्या संग्रहातील 'पद्यकल्प' आणि 'ब्रह्म चालक' या भीमाच्या स्वत:च्या रचना नाहीत. हे पटणारे आहे. त्याच्या या दोन कृतींची इतर आठ कृतींशी तुलना केल्यावर शैली आणि दृष्टिकोनात फरक जाणवतो. या दोन कृतींमध्ये भीमाच्या इतर साहित्यातील बोली भाषेतील समृद्ध वाक्यप्रयोग, गेयता आणि साधी भावपूर्णता आढळत नाही. याउलट 'मनुमंडल' आणि 'महिमा विनोद' यांची रचना भीमाने केली असावी असे दंतकथांतून दिसते. पण अजून त्यांचा शोध लागून त्यांचे प्रकाशन झालेले नाही.

ही अडचण बहुधा परिस्थितिजन्य असावी. दंतकथांनुसार भीमा रोज सकाळी स्नानानंतर झाडाच्या सालीवर बसून भजने गाऊन पूजा करीत असे. महिमा पंथाचे चार भक्त त्याच्या रचना तालपत्रावर लोखंडी सळीने लिहून घेत. या लेखनिकांपैकी हरी पांडा आणि वासू पांडा या दोघांची नावे विश्वनाथ बाबांच्या 'सत्य महिमा धर्म इतिहास' या ग्रंथात आढळतात. असा समज आहे की भीमा एका वेळी एका रागात चार प्रार्थनागीते लिहीत असे. तो चार लेखनिकांना ध्रुपदाची एक-एक ओळ देत असे आणि मग प्रत्येक भजन गात असे.

'भजनमाला'मधून असे दिसते की ही भजने चारांच्या गटात रचलेली आहेत. एका भजनात तो म्हणतो, "मी एका रागात चार गीते रचली. मी दुर्दैवी भीमा आहे पण माझा गुरू सर्वशक्तिमान आहे. मी त्याच्या निर्भय ध्वजाचा आश्रय घेतला आहे. आणि त्याच्या चरणांचे तीर्थ प्राशन करीत आहे. त्याच्या कृपेने ज्ञानचक्षूंनी मी आंतरिक आणि बाह्य सत्य पाहू शकतो."

विविध रागांतील आणि छंदांतील त्याची एकूण भजने तीनशे दहा आहेत. कदाचित त्यातील बरीचशी अजून सापडलेली नसावीत किंवा हरवली असतील. असे सांगितले जाते की भीमा आपल्या रचना महिमा स्वामींच्या समोर गाण्यासाठी पाठवून देत असे. नंतर भक्ती गीते तंबोरा आणि चिपळ्या यांच्या साथीने गात असत. पहिले भजन आठगढ जवळच्या खुंटणी येथे 1865 मध्ये गायले गेले असे सांगितले जाते. या प्रक्रियेमध्ये अनेक भजने गहाळ किंवा नष्ट झालेली असतील अशी शक्यता आहे.

भीमा भोईच्या काव्यात उपेंद्र भांजा यांच्या काव्यातील तांत्रिक सफाई किंवा कौशल्य दिसून येत नाही. उपेंद्र भांजांचे शाब्दिक करामतींचे वेड आणि एक शब्द एका ओळीत त्याच्या विविध अर्थांनी वापरून संगीतमय परिणाम साधण्याचे कौशल्य असाधारण होते. उपेंद्र भांजांनंतर तसे प्रयत्न कोणी केले नाहीत. 19व्या शतकाच्या शेवटच्या दशकात राधानाथ राय यांच्या काव्यात तपशीलवार वर्णनाची आणि शब्दातून चित्रे रंगवण्याची जी हातोटी दिसते तशी भीमाच्या काव्यात सापडत नाही. त्याच्या काव्यात बालकृष्ण, वनमाळी किंवा कविसूर्य यासारख्यांच्या काव्यातली भावपूर्णता आणि गेयता थोड्याशा फरकासह दिसून येते. गोपाळकृष्ण, वनमाळी आणि कविसूर्य यांचा मुख्य विषय राधाकृष्ण आणि त्यांच्या दिव्यप्रेमाच्या इंद्रधनुष्याचे विविध रंग हा आहे तर सामाजिक अध:पातामुळे आणि व्यक्तिगत मोक्षासाठी तळमळणाऱ्या आत्म्याची यातना हा भीमाच्या काव्याचा प्रमुख विषय आहे. त्याच्या काव्यामध्ये सामान्य आणि वैश्विक, सामाजिक आणि वैयक्तिक यांचे वैशिष्ट्यपूर्ण मिश्रण आढळते. इतर तीन भावगीतकारांमध्ये बहुधा सर्वसाधारण विषय आहेत आणि अलिप्तता व (वेदनेची सौंदर्यात्मता Romanatilised) यांचे वर्चस्व दिसते. याउलट भीमा भोई आत्मनिवेदनपर सुरात बोलतो आणि त्याच्या कवितेची प्रेरणा म्हणजे वैयक्तिक मोक्षासाठी आणि समाजातल्या माणसाला कठोर दैवापासून मुक्ती मिळावी यासाठी चाललेली त्याची तळमळ ही आहे. या दृष्टिकोनातून पहाता त्याच्यामध्ये दीनकृष्णाचा व्याकुळ भावाविष्कार, जगन्नाथ दासाच्या भागवतामधला निखळ साधेपणा व स्पष्टता आणि सरला महाभारतामधला द्रष्टेपणा आणि नियतीचा समान अनुभव ही वैशिष्ट्ये आढळतात.

संस्कृत वाङ्मयातून उसन्या घेतलेल्या प्रकांड ज्ञानाने किंवा शब्दांच्या आणि वाक्यप्रयोगांच्या चमत्कृतींनी किंवा तांत्रिक करामतीने वाचकांना दिपवावे अशी त्याची इच्छा कधीच दिसत नाही. भाषा आणि प्रतिमा हे त्याच्या काव्याचे साध्य नाही, केवळ साधन आहे. त्याचा भर शारीरिकतेवर किंवा विकारशीलतेवर नसतो. अर्थपूर्णता आणि आशयघनता यांची तळमळ असलेल्या आत्म्याचे चिंतन असेच मुख्यत: त्याच्या भजनांचे, कौतिसांचे,

गीत प्रकारांचे ही स्वरूप आहे.

भीमा भोईच्या लेखनात भजनांचे स्थान फार महत्त्वाचे आहे. ही भजने स्वतंत्रपणे किंवा समूहाने गाण्यासाठी होती आणि काही वेळा ती वाद्यांच्या साथीने गायली जात. त्यांच्यामध्ये मुख्यत: आध्यात्मिक अनुभव साध्या आणि अनलंकृत शैलीत वर्णन केलेले आहेत. काही भजने दीर्घ आणि गीतांसारखी आहेत. उडीया साहित्याच्या विकासाला या भजनांचा मोठाच हातभार लागलेला आहे. सर्वसाधारणपणे त्यांचे सगुण आणि निर्गुण असे दोन प्रकार केले जातात. पहिल्या प्रकारामध्ये भक्त आपल्या उपास्य देवाची किंवा देवाची स्तुतिस्तोत्रे गातो आणि त्या दैवताच्या अलौकिक किंवा बुद्धीला अगम्य अशा शक्तींचे गुणगान करतो. भक्त आपली आंतरिक तळमळ प्रकट करतो आणि इह-परलोकात कृपा लाभावी म्हणून प्रार्थना करतो.

दुसऱ्या प्रकारच्या भजनात भक्त कोणत्याही भौतिक प्राप्तीची किंवा ऐहिक अथवा पारलौकिक मुक्तीची इच्छा व्यक्त करीत नाही. भीमा भोईने दोन्ही प्रकारची भजने लिहिली आहेत. काही भजनांमध्ये समाजकल्याणाची इच्छा आणि समाजाविषयी चिंता असूनही ती तटस्थ आणि अलिप्त वाटतात. इतर काही अत्यंत व्यक्तिगत, भावपूर्ण, उत्कट आणि शरीर संवेदना वर्णन करणारी आहेत. याचे कारण कदाचित हे असेल की भीमा भोईच्या जीवनामध्ये आणि सामाजिक समस्यांविषयीच्या दृष्टिकोनामध्ये एक द्वैत होते. त्याला लोकांची, समाजाची तीव्र चिंता होती, त्याचबरोबर तो अंतर्मुख अंत:केंद्रित आणि व्यक्तिवादीही होता. या भजनांची भाषा बहुश: प्रतीकात्मक आहे आणि या प्रतीकांचे अधिक तपशीलवार विश्लेषण करणे आवश्यक आहे. काही वेळा ही प्रतीके तांत्रिक धार्मिक परिभाषेच्या कक्षेतच राहतात. या विषयातील तज्ज्ञांनाच ती समजू शकतील पण तरीही एकंदरीत ही प्रतीके शरीर आणि मन यांच्याविषयीच्या आध्यात्मिक कल्पना, जीवन आणि जग या बद्दलची असल्याने अगदीच दुर्बोध राहत नाहीत.

भजनांच्या परंपरेचा मागोवा आपल्याला 'चर्यापद' आणि वैदिक स्तोत्रांमध्येही घेता येतो. अच्युतानंद, बलराम, कबीर, नानक आणि सूरदास, शिवाय इतर अनेक संतकवी याच पठडीतले होते. त्यांचे ध्येय बुद्धी आणि भक्ती यांच्या प्रामाणिक आणि उत्कट संयोगातून जीवाचा शिवाशी होणारा संवाद मांडणे हेच होते. या भजनांमध्ये परमेश्वराच्या साकार रूपाचे तसेच निराकार रूपाचेही उल्लेख येतात आणि भौतिक शरीर आणि आत्म्याच्या स्वरूपाविषयीही विवेचन येते. या पूर्वीच्या शतकांमध्ये राम आणि कृष्णाचा उल्लेख लेखक 'अलेख निरंजन' असा करीत असतात. भीमा भोईने सुद्धा त्याला काव्य प्रेरणा देणाऱ्या महिमा गोसावींचा उल्लेख 'अलेख निरंजन' असा केला आहे.

एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे भीमा भोईला आपण लेखक याची जाणीव नाही. त्याला लेखनासाठी लेखन करण्याची किंवा लेखक म्हणून कीर्ती मिळवण्याची कोणतीच महत्त्वाकांक्षा नाही. महिमा धर्माच्या खऱ्या संदेशाचा प्रसार करणे हे त्याच्या लेखनाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट

होते. त्यामुळे त्याच्या लेखनात त्याचे वैयक्तिक आयुष्य, त्यातील संघर्ष, त्याला गुरूकडून मिळालेली प्रेरणा, आत्म्याच्या परमात्म्याशी होणाऱ्या संवादाची स्वप्नसदृश स्थिती, वेदना आणि ब्रह्मानंदाच्या सर्व छटा या सर्वांना महत्त्वाचे स्थान आहे आणि हे सर्व त्याने इतक्या साध्या भाषेत आणि शैलीत व्यक्त केले आहे की सामान्य माणसाला ही ते सहज समजावे. भीमा भोईचे साहित्यातील मोठे यश म्हणजे त्याने उपनिषदातल्या अवघड कल्पना साध्या, गेय आणि अनलंकृत भाषेत आणि शैलीमध्ये प्रकट केल्या आहेत. परिणामत: आज सुद्धा त्याची ही भजने आणि गीते लक्षावधी लोकांच्या हृदयाची स्पंदने बनली आहेत. आणि ओरिसातल्या खेड्यात संध्याकाळच्या वेळी टाळ आणि तंबोऱ्याच्या साथीत या भजनांचे स्वर निनादताना ऐकू येतात. अवघड आध्यात्मिक संकल्पना आणि कल्पना साध्या आणि सोप्या भाषेत मांडण्याचे त्याचे विलक्षण कौशल्य या पुस्तकात घेतलेल्या कवितातल्या अनेक उदाहरणातूनही जाणवेल. अर्थात तत्त्वज्ञानातील तरल संकल्पना भौतिक वस्तू किंवा भावनांतून मांडण्यामध्ये त्याने मिळवलेले यश इंग्रजी भाषांतरात व्यक्त होणे अत्यंत अवघड आहे. उदाहरणार्थ, उपनिषदे अंतिम सत्याचा उल्लेख 'असंगोडयम् पुरुष:।' असा करतात. मित्र किंवा संबंधी किंवा संग नसलेल्या पुरुषाचीही तरल आध्यात्मिक कल्पना उच्च संस्कृतनिष्ठ वाक्यप्रयोगातून व्यक्त केली आहे. भीमा भोईने त्याचे अलिप्त आत्म्याप्रमाणे चित्रण करून त्याला वस्तुनिष्ठ स्वरूप दिले आहे आणि अतिशय महत्त्वाच्या तत्त्व आणि आध्यात्मिक कल्पना भीमाच्या भजनांच्या भाषेतून आणि विषयातून सघन आणि सोप्या होऊन येतात. या बाबतीतले त्याचे यश इतके उच्च पातळीचे आहे की उडीया धार्मिक साहित्याच्या विकासामध्ये ते अतुलनीयच मानावे लागेल.

6.

काव्यातील निवडक उतारे

भीमाच्या काही कविता 'स्तुतिचिंतामणी'मध्ये भीमाच्या चरित्रातले अनेक तपशील असले आणि ते श्रेष्ठ काव्य असले तरी त्याचे उत्कृष्ट कौशल्य त्याच्या भजनांमध्ये दिसून येते. असे सांगतात की, तो ही भजने गात असे आणि त्याचे शिष्य ती उतरून घेत असत. या भजनातून अतिशय हृदयस्पर्शी अशी प्रामाणिक तळमळ आणि धार्मिक भावना दिसून येते. त्यामध्ये त्याची वेदनाही आहे जी एकाच वेळी वैयक्तिक आणि वैश्विकही आहे. त्यापैकी सात भजने इथे दिली आहेत.

भीमाची सुरुवातीच्या काळातील एक रचना 'स्तुतिचिंतामणी' म्हणजे प्रत्येकी दोन ओळींच्या वीस कडव्यांच्या शंभर बोलींचा संग्रह आहे. ही सुप्रसिद्ध कृती त्यातील बोलींच्या धार्मिक निष्ठेमुळे आणि मिताक्षरी आणि बोली भाषेतील वाक्यप्रयोगांमुळे वैशिष्ट्यपूर्ण झाली आहे. इथे चार बोलीतील उताऱ्यांचे गद्य भाषांतर दिले आहे.

★ भाषांतरे लेखकाने केली आहेत.

1\.

त्याला हात नाहीत, पाय नाहीत
खरोखर कोण त्याला धरू शकेल ?
या ब्रह्माचा मूळचा आकार
क्वचितच कोणी पाहू शकेल.
त्याला पोट नाही, कमर नाही
खरोखर या मानवी बुद्धीने
त्याचे आकलन अशक्य आहे
या साऱ्या त्रिभुवनात
त्याच्यासारखा प्रशांतिरूप कोणी नाही.
स्तुती आणि निंदा, नफा आणि नुकसान
या सर्वांविषयी तो उदासीन आहे.
तो अन्न घेत नाही

आणि कोणा पति-पत्नींच्या मीलनातून
त्याचा जन्म झालेला नाही.
भूक आणि तहान भागवण्यासाठी
तो अन्न किंवा पाणी घेत नाही.
धूळ त्याला स्पर्शीत नाही
आणि त्याचे शरीर प्रकाशत असते
अपार तेजाने.
तो उभा असतो निद्रासुखाचा अनुभव घेत
आणि अवतरतो तिथे
जिथे भक्तांची भावोत्कट हृदये
त्याचा शोध घेत असतात.
त्याला नाहीत पाहणारे नेत्र
नाहीत ऐकणारे कान
चेहरा जीभ नाकही नाही
तो कधी उत्तर देत नाही
नुसता वाऱ्याच्या झुळकीत विरून विराजमान असतो.
तो वळत नाही तरीही फिरत असतो
शून्याने महाशून्यात विलीन व्हावे त्याप्रमाणे
मुख आणि जिव्हा त्याला वर्णिताना मूक होतात
तो वैभवाचा सम्राट आहे
तो ब्रह्मानंदाची गंगोत्री
त्याच्या इच्छामात्रे चालते हे राज्य त्रिभुवनाचे
आणि तरीही तो कोठेही नसतो.
तो आहे साऱ्या आकारांहून वेगळा
आणि तरीही तो आहे नियंता पवित्र धर्माचा
कर्ता-करविता यच्चयावत् कर्मांचा
तो आहे शून्याच्या कणाकणात
आणि चेतना प्रत्येक कर्माच्या कारणात.
त्या ब्रह्माची दाहक तेजोराशी
अशक्य मज जाणे तयापाशी
केवळ मम मनाच्या आकाशी
जाणवे अस्तित्व तयाचे
भीमा म्हणे ते परब्रह्म

मज भेटेल जरी निरंजन
तरी माझे या जगातले जीवन
सांगेन त्याला समग्र.

2\. ग्रहांमधल्या त्या आदिम रित्या घराचे चिंतन कर
सर्वत्र अथांग शांतीचे साम्राज्य
आणि वातावरण भरलेले विलक्षण संगीत
अथांग सागर इथे पण पाण्याचा थेंबही नाही
केवळ हृदयातल्या चिखलाची दलदल
चार द्वारांनी रोखलेले निरस्तित्व अवकाश
प्रत्येक पावलावर प्रस्फुटित तेज
मृत्यूला इथे स्थान नाही
ते राजाप्रमाणे सजलेले आहेत
पण त्यांच्या अंगावर वस्त्रे नाहीत
या महालात नृत्य चालू आहे पण संगीत नाही.
तो अनाम या नृत्याच्या मध्यभागी विराजमान
अपुऱ्या प्रतिमांच्या वेड्यावाकड्या भाषेत
त्याच्या तेजाचे वर्णन शक्य नाही.
तो सर्व पापांचे निवारण करतो
जन्म आणि मृत्यू त्याच्या पायाशी उभे आहेत.
कुठल्याच ग्रंथाला त्याच्या आकाराचे चिंतन शक्य नाही.
तो अमर आणि अविनाशी आहे
मूढ, हीन भीमा म्हणतो की
त्या एकाक्षर ब्रह्माच्या नामस्मरणात
दिव्य संगीत आहे आणि ते पापक्षय करते.

3\. तुम्ही कोणी त्याला पाहिले का ?
अतिथीच्या वेषातला तो वृद्ध गुरू
या मार्गाने चालला होता.
मातापित्यावाचून त्याचा जन्म झाला.
मातेच्या स्तनावाचून त्याने मातृस्तन्य मिळवले.
मी माझ्या मांडीवर त्याला बाळाप्रमाणे जोजवले आहे.
त्याचे वय वाढले नाही

पण त्याचे तेज मात्र अधिक दैदीप्यमान झाले आहे.
तो गोराही नाही, काळाही नाही
मी त्याला अन्न दिले नाही आणि तो कधी घराबाहेर गेला नाही.
मी त्याचे नाव ठेवले नाही
आणि ज्योतिष्याकडून त्याची पत्रिका केली नाही
तो धुळीच्या रस्त्यावर खेळत असे.
त्याला आकार नाही आणि कांती नाही
आणि तरी तो विलक्षण दीप्तीने तेजाळतो आहे,
त्याला अवयव नाहीत आणि तरी तो चालतो
तो वल्कले परिधान करतो
ही पृथ्वी आणि हे आकाश मला सांगतात
की हा माझा पुत्र साधू होईल
आणि तो आम्हा सर्वांचा उद्धार करील.
पापी अज्ञानी भीमा म्हणतो की
या घोर अंधाऱ्या कलियुगात जर मला तो दिसला
तर मी त्याला छातीशी कवटाळीत त्याची चुंबने घेईन.
मी त्याला चहूबाजूला शोधतो आहे.

4. त्याला रूप नाही, आकार नाही
पहा, तो विदेही प्रकट झाला आहे.
वारा नाही पण पाऊस कोसळतो आहे
अस्तित्वाचा अंतिम श्वास चहूबाजूनी गरजतो आहे
नदी पुराने भरून वाहते आहे
किनारे दिसेनासे झाले आहेत.
आणि पृथ्वीवर उल्कांचा वर्षाव होत आहे.
चमकणारी भिजलेली धरणी आता सुकली आहे
आणि तो दृश्यमान झाला आहे
अजून दारे सुद्धा उघडलेली नसताना
ब्रह्माच्या आश्रमामध्ये
जिथे उदयही नाही आणि अस्तही नाही
अनाहत शब्द, निष्काम, नि:शब्द क्षण
त्याची कल्पना करू नको
त्या पदकमलांचा आश्रय घे

त्याला पाहण्याची आस धरू नको
आशा अपेक्षा सोडून त्याला प्रसन्न कर.
वाळू माती नसलेले हे तळे चमचमते आहे.
गंगाजल सोडून तू कूपजलापाशी आलास
पूर्व जन्मीचे काही सुकृत असेल तर तुला मुक्ती मिळेल
मुळे-झाडे नाहीत तरी सावल्या पसरतात
कळ्या-फुले नसताना फळे आली आहेत.
देठावाचून पाने विस्तारतात.
आणि कर्मविहित मार्गाने त्याची प्राप्ती झाली.
निरवयव वल्कलधारी पती-पत्नी रत होतात
भीमसेन भोई म्हणतो की त्या प्रभूच्या पायाशी नेहमी लीन व्हा.

5. जीवनाच्या महासागरात मी गटागंळ्या खातो आहे
प्रभू, माझी व्याकुळ विनवणी का ऐकत नाहीस ?
तुला दिवस रात्र क्षणोक्षणी साद देताना
माझा कंठ सुकून गेला
मी चातकपक्षी तुझ्या जलवर्षेची वाट पहातो आहे.
हृदयकमलात एकसारखे मी तुझे चिंतन करतो आहे
पण तरीही त्रैलोक्यनाथा, तू निष्ठुरच कसा राहिला आहेस ?
तुझ्या शब्दाने या अखिल विश्वाचा व्यवहार चालतो
आणि भक्तवत्सल म्हणून तुझ्या ब्रीदाची पताका फडकते आहे.
मग या पापी पामराचे जीवन अजून असेच कसे ?
भीमा भोई म्हणतो की आता माझ्या अपराधांची क्षमा करा.

6. वेलींनी वेढलेल्या वनात विहार करून ती दोन फुले पहा
या त्रिभुवनामध्ये ती रोज नव्याने फुलतात.
या वृक्षाला मुळे नाहीत
पण तो मेरू पर्वतापेक्षा दुपटीने मोठा आहे.
वसंत ऋतू नाही तरी झाड बहरले आहे
फुले फुलतात आणि गंधावाचून गळून पडतात.
या छायाहीन वृक्षाखाली ते राहतात
कळ्या गळून पडल्या की ते सर्व नष्ट होतील.
फुलांचे रंग चार आहेत

पण मधाऐवजी तिथे विष आहे.
चमकणाऱ्या चार पाकळ्या आहेत
पण चार रंगाच्या मधमाशाजवळ सुद्धा जात नाहीत.
भक्तांच्या हृदयात ते फूल अदृश्य होते
भीमा भोई म्हणतो की साधुजन हो,
त्या फुलाचा परिमळ अनुभवा.

7. तो अरूप निराकार शून्यमंदिरात विहार करतो
तुम्ही त्याची दोन पावले पाहू शकणार नाही
पण त्या एक रुपाचा आश्रय घ्या.
त्या अनाम अज्ञात प्रदेशात त्याचा निवास आहे
साधुजनहो, तिथे अतिउष्णता नाही, अति थंडी नाही.
त्या अस्वाद्य, अदृश्य, अनाम अमृताच्या
स्वादाला आणि मधुरतेला तोड नाही.
विजेपेक्षा प्रखर-निमिषापेक्षा वेगवान
त्याच्या त्या रूपाची भ्रांती ज्ञानीजनांना पडली आहे.
परमशांतीमध्ये त्याचे दर्शन घेण्याचे भाग्य ज्याला लाभते
तो जन्म-मृत्यूचा भवसागर पार करून
अखंड ब्रह्मपदी विलीन होतो.
तुमची सर्व क्रिया कर्मे निरूपयोगी आहेत
त्याऐवजी साधुसंगतीत तुम्ही निष्कामतेचे तत्त्व स्वीकारा
आणि एकाक्षर ब्रह्माचे चिंतन करा.
ब्रह्माच्या राज्यात उदय नाही - अस्तही नाही.
पामर भीमा म्हणतो की या अंधाराला पार करणे अवघड आहे.

पंधराव्या बोलीतील काही पद्ये –

चरापासून अचरापर्यंत, किड्यापासून पक्ष्यांपर्यंत मी जेथे कोठे पाहतो त्या सर्व जीवांमध्ये तू वास करीत असल्याचे मला जाणवते. त्यामुळे कुठली वस्तू लहान किंवा मोठी असे मला म्हणता येत नाही. तुझे प्रेमाने स्मरण करणाऱ्यांच्या जवळ तू असतोस असे म्हणतात. ज्यांच्या हृदयात प्रेम नाही त्यांच्यासाठी तू अदृश्य असतोस आणि भक्तांच्या प्रेमाचा दास असतोस. परमेश्वरा, मग माझ्या प्रार्थना तू का ऐकत नाहीस? माझ्यावर तू का रागावला आहेस? तुझी भक्ती सोडून मी दुसऱ्या कशात गुंतलो आहे का? तुझ्या दिव्य चरणांची पूजा करताना मी कुठली पापे केली आहेत? तू मला शिक्षा देतो आहेस आणि बहुधा

माझ्या प्रार्थना तू ऐकत नाहीस. तुझी करुणा बाजूला ठेवून तू मला दूर करतो आहेस.

मी तुझ्यासाठी सतत तळमळतो आहे. तरीही मनात अनेक आशा आहेत. जन्म जन्मांतरापासून मी दु:खी आणि दुर्दैवी आहे. आणि या युगात सिद्धी व कृपा मिळवण्याची माझी पात्रता नाही.

कुठल्या योगाने मी तुझी उपासना करू? कुठल्या मार्गाने तुझी पूजा करू? सत्यज्ञान तर मला नाही. मी ना द्रष्टा, ना पंडित आणि माझ्यात धार्मिकताही नाही. पण मी तुझ्या दारातला याचक आहे. तू माझे स्वागत कर किंवा मला मारून टाक मला शत्रूंनी घेरलं आहे. मला मनोमन एवढंच जाणवतं आहे की माझी शक्ती माझा परमेश्वर हीच आहे. तू परमेश्वर आहेस आणि तू सर्व कर्मांचा विषय आहेस आणि तरीही माझ्यासाठी सर्व गोष्टी निष्फळ होत आहेत. तू जीवन दिलं आहेस आणि तरीही तू माझ्या मुखात दोन घास देत नाहीस. हा कुठला रे न्याय?

बावीसाव्या बोलीतील काही पदे –

जंगलामध्ये गुरे घेऊन मी रोज भटकतो. तहान भुकेने जीव व्याकुळ झाला की मी जीव वाचवण्यासाठी टेकडीवरच्या झऱ्याचे पाणी पितो. आकाशाकडे पहाताना माझ्या मनात विचार येतो की अजून जायची वेळ झाली नाही आणि जाऊन तरी काय करायचं? कारण माझ्यासाठी घासभर अन्न नसेल, पाणी सुद्धा नसेल. आणि हे आयुष्य - असं शिव्याशाप घेत जगण्यापेक्षा शतखंडित का होत नाही? तरीही मी या सर्व दूषणांपासून आणि तणावांपासून अलिप्त राहून हृदयाला धीर देऊन शांत राहण्याचा प्रयत्न करतो. माझ्या डोळ्यातून अश्रू नव्हे तर रक्तच येत आहे आणि मी ते हातांनी पुसून टाकतो. दुसऱ्या कोणालाही हे माहीत नाही. फक्त माझ्या श्री गुरूनाच माझे हे भोग, माझ्या या यातना माहीत आहेत. ते दिवस आठवले की माझं काळीज फाटून जातं. हृदयात बाण शिरतो आणि संतापाची ज्वाला उफाळू लागते. बारा ते चौदा वर्षांपर्यंतचा माझा काळ असा गेला आहे. मी काय कष्ट सोसले आणि कोणत्या यातना मला जाळताहेत ते माझ्या मनालाच ठाऊक!

मी या रितेपणाकडं पहातो आणि आयुष्य कसं जगत राहायचं हे मला कळत नाही. कुठल्या फांदीचा आधार घेऊ ते कळत नाही. यातनांच्या या नदीच्या पार कसं जायचं, ते मला कळत नाही.

मातेच्या उदरातले गोपा आणि मधुपुर माझ्या मनातून अजून गेलेले नाहीत. तिथं शिकलेले काही धडे माझ्या अजून लक्षात आहेत. मी सत्यामध्येच मरून जाईन, सत्यामध्येच स्वत:ला वाचवीन. भीमा भोई म्हणतो की मला हीच आज्ञा झालेली आहे. सगळी चांगली आणि वाईट कृत्ये या मर्त्यलोकातच राहतात.

२७व्या बोलीतील पदे –

हित आणि अहित, मोक्ष आणि दुर्गती ही द्वैते तूच निर्माण केलीस. हे पापांचे डोंगर कोण उचलू शकेल ? हे सर्व तू तुझ्या पायाशी घे.

तू लक्षात कसं घेत नाहीस की मी कोठेही पळून जाऊ शकत नाही. सर्व पापं एकत्र करून त्यांची परडी मी फक्त तुझ्या पायाशी ठेवू शकतो. तुझ्या पायांचा आश्रय घेण्याच्या प्रयत्नात सर्व भक्त पृथ्वीवर तळमळत आहेत. त्यांच्या पापांची क्षमा कर आणि हे गुरू देवा त्यांचा उद्धार कर. या जीवनातली दु:खे व भोग अमर्याद आहेत. ती कोण पाहू आणि साहू शकेल ? माझा आत्मा नरकात पिचत राहिला तरी चालेल पण या विश्वाचा उद्धार होऊ दे.

परमेश्वरा, सूर्याचे किरण फाकल्यावर अंधार जसा विदीर्ण होतो तशी ज्ञानाच्या तलवारीने माझी पापे विदीर्ण होऊ देत. देवा, रात्री चंद्र उगवल्यावर चहूकडे प्रकाश पसरतो, त्याप्रमाणे माझ्या पापाचे ओझे दूर कर. गारूड्याच्या मंत्राने सर्पदंश बरा होतो, त्याचप्रमाणे तुझ्या कृपेने मला लपेटणाऱ्या पापवल्ली नष्ट कर. रोग्याच्या शरीरातले समुद्राइतके पाणी आणि येणाऱ्या मृत्यूची कारणे वैद्य आपल्या जालिम विषारी औषधाने त्वरित नष्ट करतात. त्याप्रमाणे, भगवंता, माझ्यामधला पापाचा समुद्र नष्ट होऊ दे आणि ज्ञानाच्या औषधाने मला कायमची रोगमुक्ती मिळू दे. धोबी जसा मळलेले कपडे स्वच्छ करून उजळ करतो त्याप्रमाणे माझ्या पापाचे मालिन्य दूर करून मला उजळ कर. ईश्वरा, आगीतून तावून सुलाखून सोने जसे उज्ज्वल बनते, त्याप्रमाणे ब्रह्माच्या आगीतून तावून सुलाखून माझी पापे जळून जाऊ देत.

●●●